बॉम्बे चष्माघर
गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
☎-235222,मो.9021853108

आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६८ ■ अंक क्र.१५५ ■ शनिवार १५ मार्च २०२५ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.NO./DHL/53/24-26

उत्कृष्ट क्वालिटी
साबुदाणा ५५ रु.किलो
शेंगदाणे १०० रु.किलो
सेंद्रिय गुळ ५० रु.किलो
सागर ड्रायफ्रुट
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००)

विधान परिषदेच्या पाच जागांसाठी उमेदवार निश्चित! शिंदे गटात रस्सीखेच; नंदुरबारचे रघुवंशीही चर्चेत

मुंबई, दि.१४ (प्रतिनिधी)- राज्य विधानपरिषदेच्या पाच जागांसाठी येत्या सत्ताविस तारखेला निवडणूक जाहीर करण्यात आली आहे. या रिक्त जागांमध्ये राष्ट्रवादी आणि शिवसेनेला प्रत्येकी एक तर भाजपला तीन जागांवर उमेदवार देता येणार आहेत. संख्याबळाचा विचार केला तर विरोधी पक्षाकडे एकही जागा निवडून आणता येईल असे संख्याबळ नसल्याने ही निवडणूक एकतर्फी होण्याची शक्यता आहे. दरम्यान, शिवसेनेच्या कोट्यातील एका जागेसाठी अर्धा डझन नेते उत्सुक आहेत. यामध्ये शिवसेनेच्या प्रवक्त्या शीतल म्हात्रे आणि नंदूरबारमधील बलाढ्य नेते चंद्रकांत रघुवंशी आघाडीवर आहेत.

विधानसभा सदस्यांमधून विधानपरिषदेवर नियुक्त झालेल्या पाच सदस्यांची २०२५ च्या सार्वत्रिक निवडणूकीत थेट विधानसभेत नियुक्ती झाल्याने त्यांच्या उर्वरित रिक्त कालखंडासाठी असलेल्या जागेवर भाजपकडून नांदेड येथील खासदार अशोक चव्हाण यांचे निष्ठावंत अमर राजूरकर, वर्धा येथील भाजपचे बंडखोर दादाराव केचे आणि कोकणातील अनेक वर्ष प्रतिक्षेत असलेले माधव भांडारी यांच्या नावांची शिफारस भाजपने केंद्रीय नेतृत्वाकडे केल्याचे सांगण्यात येत आहे. तर शिवसेनेकडून नुकतेच राजापूर मतदारसंघातून पक्षात आलेले राजन साळवी यांना संधी मिळण्याची शक्यता आहे. राष्ट्रवादीकडून वांद्रे मतदारसंघातून विधानसभेत पराभूत झालेले झिशान सिध्दीकी यांना संधी दिली जाण्याची शक्यता आहे अशी सूत्रांची माहिती आहे. या पाचही जागी बिनविरोध निवड जाहीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

भाजपमध्ये या विधानपरिषदेच्या तीन जागांमध्ये जो कार्यकाळ आहे तो केवळ १६ ते १९ महिन्यांचा असल्याने सध्या स्थानिक राजकीय समिकरणांचा विचार करत उमेदवारी देण्यात आल्याचे मानले (पान ४ वर)

बीडमध्ये खोक्याच्या घरावर बुलडोझर

बीड, दि.१४- बीडमधील वाढत्या गुन्हेगारीचा विषय गेल्या तीन महिन्यांपासून सातत्याने चर्चेत आहे. आकांची ताकद प्रचंड आणि त्यामुळे उदंड झाले गुंड अशी बीडमधील परिस्थिती आहे. गेल्या काही दिवसांपासून तर बीडमधील सगळ्याच प्रमुख नेत्यांच्या, आमदारांच्या निकटवर्तीयांच्या गुंडगिरीचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले. भाजप आमदार सुरेश धस यांचा कट्टर समर्थक असलेला सतीश भोसले उर्फ खोक्याला पोलिसांनी परवाच अटक केली. त्यानंतर काल त्याचे घर जमीनदोस्त करण्यात आले. गुंडगिरी करुन दहशत माजवणाऱ्या खोक्याच्या कुटुंबियांनी घरावर झालेल्या तोडक कारवाईचा निषेध केला आहे. सतीशविरोधात सुरु असलेली (पान ४ वर)

राज्यातील प्रसिद्ध काठीची राजवाडी होळी उत्साहात ढोल, घुंगुरुंच्या आवाजांनी निनादल्या दऱ्या-खोऱ्या

नंदुरबार, दि.१४ (प्रतिनिधी)- राज्यासह देशात प्रसिध्द. असलेल्या काठीतील राजवाडी होळीचा आनंद लुटण्यासाठी नंदुरबार जिल्हयाचे तत्कालीन पालकमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे संपर्क प्रभारी तसेच प्रदेशाचे वरीष्ठ. उपाध्यक्ष अनिलदादा पाटील यांनी काठी येथे हजेरी लावली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ.अभिजित मोरे, रतन पाडवी, सिताराम पावरा, मोहन शेवाळे, नरेंद्र नगराळे, मधूकर पाटील, सुरेंद्र कुंवर, छोटू कुवर आदी मान्यवर उपस्थित होते.

नंदुरबार जिल्हयातील काठी येथील राजवाडी होळी ही देशभरात प्रसिध्द. आहे. काठीची होळी पाहण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे नंदुरबार जिल्हयाचे संपर्क प्रभारी तसेच राज्याचे वरीष्ठ. उपाध्यक्ष आमदार अनिलदादा पाटील यांनी होळीचा आनंद लुटला. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस रतन पाडवी यांच्या निवासस्थानी आ.अनिल पाटील यांचा सत्कार करण्यात आला. आदिवासींची परंपरा, रात्रभर चालणारा उत्सव, ढोल, घुंगरुंचा आवाज दऱ्या खोऱ्यात निनादतांना पाहून आ.पाटील हे प्रचंड भारावले. राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी नवापूर, नंदुरबार, शहादा येथून आले. रात्रभर होळीचा आनंद लूटण्यात आला. आदिवासीं बांधवांचे पारंपारिक नृत्य आणि काठीच्या राजवाडी होळी उत्सवात लाखांहून अधिक आदिवासी बांधवांची हजेरी लाभली होती.

बँकेच्या जप्ती पथकासमोरच विष घेतलेल्या शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू, पार्थिवावर दुसऱ्या दिवशी केले अंत्यसंस्कार

शिरपूर दि.१४ (का.प्र.)- पॉलिहाऊस, ठिबक सिंचन व पीक कर्ज थकल्याने जप्तीसाठी आलेल्या बँक ऑफ महाराष्ट्रच्या अधिकाऱ्यांसमोरच वृद्ध शेतकऱ्याने विष प्राशन करून आत्महत्या केली. ही घटना १२ मार्चला दुपारी तालुक्यातील वाडी खुर्द गावात घडली होती. या घटनेमुळे संतप्त झालेल्या मृताच्या नातलगांनी मृतदेह ताब्यात घेण्यास नकार दिल्यामुळे दोन दिवस मृतदेह उपजिल्हा रुग्णालयातच होता. १३ मार्चला मृतदेहावर रात्री उशिरा अंत्यसंस्कार करण्यात आले.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, वाडी खुर्द येथील रहिवासी हरिश्चंद्र दगा पाटील (वय ८८ वर्ष) यांनी बँक ऑफ महाराष्ट्रकडून पॉलिहाऊस प्रकरण, ठिबक सिंचन बसवणे व पीक कर्ज यासाठी कर्ज घेतले होते. दीर्घ काळापासून कर्ज थकल्याने व्याजासह रक्कम मोठी झाली. कर्ज मुदतबाह्य झाल्यानंतर बँकेने जप्तीची प्रक्रिया सुरू केली. १२ मार्चला बँकेचे अधिकारी वाडी गावात गेले. त्यांनी हरिश्चंद्र पाटील यांची मुलगी पपीलाबाई पाटील यांना बोलावून घेतले. त्यावेळी हरिश्चंद्र पाटील घरी एकटेच होते. मुलीने त्यांना जप्तीसाठी अधिकारी आल्याबाबतची माहिती दिली. त्यावर पाटील यांनी अधिकाऱ्यांना नमस्कार करून मी वृद्ध असून घरातील सामान हलवू शकत नाही. माझी मुलेही घरी नाहीत, ती आल्यावर सामान काढू असे सांगितले. त्यानंतर ते घराच्या मागील बाजूस गेले. तेथे त्यांनी विष प्राशन केले. विषाची बाटली हातात घेऊन ते पुन्हा अधिकाऱ्यांनी समोर आले. मी आता विष (पान ४ वर)

बसच्या धडकेने दुचाकीस्वार ठार शिरपूर-शहादा रोडवरील दुर्घटना

शिरपूर दि.१४ (का.प्र.)- भरधाव बसने मोटारसायकलला धडक देऊन झालेल्या अपघातात युवक ठार झाला. हा अपघात १२ मार्चला सायंकाळी सातला शिरपूर-शहादा रस्त्यावर धाकड फार्महाऊस पुढे घडला.

पंकज यशवंत पाटील (वय २५, रा.वाडी बु.) असे मृत युवकाचे नाव आहे. त्याचा शेतीसह कुक्कुट पालनाचा व्यवसाय होता. तो कोंबड्यांचे खाद्य घेण्यासाठी शिरपूरला येत होता. मध्यप्रदेश परिवहन मंडळाच्या बसने त्याच्या मोटारसायकलला धडक दिली. या अपघातात गंभीर जखमी झाल्याने पंकजला येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रकृती खालावल्याने त्याला धुळे येथे नेण्यात आले. मात्र उपचार घेतांना त्याचे निधन झाले. त्याच्यावर वाडी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. मध्यप्रदेश परिवहन मंडळातर्फे खाजगी ठेकेदारांना प्रवासी वाहतुकीचा मक्ता दिला (पान ४ वर)

धुळ्यात काँग्रेस भवनच्या प्रांगणात पेटवली शासनाच्या भ्रष्टाचाराची होळी

धुळे, दि.१४- शहरातील काँग्रेस भवनच्या प्रांगणात प्रदेश सचिव युवराज करनकाळ यांच्या नेतृत्वात राज्य शासनाच्या निषेधार्थ भ्रष्टाचाराची होळी पेटविण्यात आली. होळी पेटवितांना काँग्रेसचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सरकारने निवडणुकपुर्वी लाडक्या बहिणींना पंधराशे रूपये देण्याचे आश्वासन दिले होते. आता तेही मिळत नसल्याची स्थिती सध्या आहे. शेतकऱ्यांना कर्ज माफी दिली नाही. विज बिले दुप्पट दिली आहेत. धुळे शहरात मनपाने मुंबई, पुणे व नाशिक पेक्षाही अधीकची घरपट्टी लादली. भ्रष्टाचारी सरकारचा निषेध करण्यासाठी होळी पेटविली असल्याचे करनकाळ यांनी यावेळी स्पष्ट केले. शासनाच्या निषेधार्थ महागाई वाढविणाऱ्यांची होळी, बेरोजगारी वाढविणाऱ्यांची होळी, भ्रष्टाचार करणाऱ्यांची होळी, महिलांना असुरक्षित ठेवणाऱ्यांची होळी, गुंडगिरीला पोसणाऱ्यांची होळी यांसारख्या अनेक फलकांचा समावेश होता. यावेळी शासनाच्या निषेधार्थ घोषणाबाजी करण्यात आली. याप्रसंगी काँग्रेसचे प्रदेश सचिव युवराज करनकाळ, डॉ. एस.टी.पाटील, डॉ.दरबारसिंग गिरासे, अलोक रघुवंशी, राजेंद्र खैरनार, भिवसन अहिरे, हरिभाऊ चौधरी, अय्युब खाटीक, खलील अन्सारी, महेंद्र निकम, दीपक पाटील, कैलास पाटील, बानु शिरसाठ, अफसाना अन्सारी, श्रीकृष्ण बेडसे, धनंजय गाळणकर, पुरूषोत्तम गरूड यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते पस्थित होते.

नर्मदेच्या तिरावर रंगला होलिकोत्सव; सावऱ्या दिगरला उत्साह

पिंपळनेर, दि.१४ (प्रतिनिधी)- समाज हा मुलतःनिसर्ग पूजक असून, तो निसर्गाला आपला देव मानून वर्षभरात वेगवेगळ्या निसर्ग देवतांची पूजा करीत असतो. ऋतुचक्रानुसार एका वेळेस एकच सण उत्सवाची पूजा तो करीत असतो. पावसाळ्यात निलपी, निलीचारी, वाघदेव, बाघदेव, बावदेव हिवाळ्यात इंदल, आयुटी, गोवाण, उन्हाळ्यात होळी आणि त्यासंबंधी अन्य सण उत्सव असा हा क्रम असतो. यंदाही सावऱ्या दिगर या नर्मदातिरी वसलेल्या गावात होलिकोत्सव साजरा करण्यात आला. आदिवासी बांधवांनी सांस्कृतिक परंपरा कायम राखली.



होळी हा उत्सवसापुड्यातील सावऱ्या दिगर ता.धडगाव जि.नंदुरबार येथील आदिवासी बांधवांसाठी आनंदाची पर्वणीच असते.होळीला आदिवासी बांधव जीवता जागता (जागृत) देवता मानतात. होळीच्या एक महिन्याआधीच प्रत्येक गावात ज्या ठिकाणी होळी पेटविणार आहे तेथे दांडा रोवला जातो आणि एकदा का होळीचा दांडा रोवला की, कोणत्याही घरात शुभकार्य करण्यात येत नाही. या संपूर्ण महिन्याभरात जे काही बरे-वाईट होईल त्याची जबाबदारी होळी घेते, असा समज सातपुड्यातील आदिवासींचा आहे.त्यामुळे या महिन्यात कोणी आजारी पडले किंवा काही अघटित घडले की,समाजातील जाणकार बुडवा,पुजारा यांचा सल्ला घेण्यात येतो आणि त्यांनी सुचविल्याप्रमाणे होळीला प्रसन्न करण्यासाठी आणि कुटुंबाबाबत नेराय (सुख-समृद्धी) येण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारची सोंग घेतली जातात.

सावऱ्या दिगर ता.धडगाव येथे मेधाताई पाटकर व वेगवेगळ्या ठिकाणाहून आलेल्या पाहुण्यांनी होळी साजरी केली.यात अमळनेरचे अहिराणी साहित्यिक, अभिनेता प्रकाश पाटील पिंगळवाडेकर, ज्येष्ठ पत्रकार साथी बापू ठाकूर धुळे येथून आलेले, युक्रांदचे साथी दिलीप पवार, राष्ट्रसेवादलाचे साथी रमेश पाकड, जिल्हा तालीम संघाचे उपाध्यक्ष चंद्रकांत नाना सैंदाणे पैलवान, (पान ४ वर)

धुळ्यात कचऱ्याची केली होळी ओमशांती ग्रुपचा अभिनव उपक्रम

धुळे, दि.१४- शहरातील रचना हाल, पारोळा रोड येथे ओम शांती सोशल गृपतर्फे सालाबादाप्रमाणे परीसरातील कचरा गोळा करुन कचऱ्यापासुन पर्यावरणपुरक होळी साजरी करण्यात आली. पर्यावरणपुरक होळीचे गृपचे चौथे वर्ष होते.

ओम शांती गृप तर्फे झाडे लावा झाडे जगवा हा संदेश ह्या पर्यावरणपुरक होळी साजरा करून देण्यात आला. झाडे तोडून होळी साजरी करण्यापेक्षा परीसरातील कचरा गोळा करावा. त्यामुळे परिसर स्वच्छ होतो व कचरा जाळल्यामुळे वृक्ष तोड होत नाही. पर्यायाने पर्यावरणाचे रक्षण होते व जागतिक ग्लोबल वार्मिंगलाही लगाम लागतो. आक्सीजनही भरपूर प्रमाणात उपलब्ध होतो हाच संदेश ओम शांती गृपतर्फे देण्यात आला. यावेळी ओम शांती गृपचे अध्यक्ष नरेंन्द्र अहिरे, राजेंन्द्र चौधरी, अशोक मराठे, सोमनाथ चौधरी, अशोक पगारे, सतिषशेठ अग्रवाल, नितिन मिस्तरी, मुकेश उपाध्ये, राजेंन्द्र नवले, चेतन कापडणे, अजय गद्रे, सुदाम सोनार, मुरलीआण्णा पाटील, हरीष शेठ पटेल, बळीराम पाटील, जगदीश साळी, अनिल चौधरी, संतोष फुलपगारे, राजुभाऊ पाटील, कमलेश जगताप, बुधाभाऊ जगताप, देविदास चौधरी, नामदेव माळी, आनंदा महाजन, रामभाऊ सोनवणे, प्रदिप जोशी, रविराज इंगोले, विनोद पाटील, महेंन्द्र पाटील उपस्थित होते.

आदर्श माता पित्यांचा सन्मान अभिनंदनीय : जिल्हाधिकारी नरवाडे दाम्पत्यास मान्यवरांच्या हस्ते धुळ्यात पुरस्कार प्रदान

धुळे, दि.१४- महात्मा गांधीजींच्या विचार आणि कार्यक्रमाशी जुळलेल्या हरिजन सेवक संघाच्या आदर्श माता पिता पुरस्काराचा उपक्रम अभिनंदनीय असून अनुकरणीय आहे. जिल्हा परिषदेचे कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांच्या मातापित्यांचा हा पुरस्कार प्रदान करून करण्यात आलेला सन्मान आम्हा सर्वांना अभिमानास्पद आहे असे प्रतिपादन जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांनी आदर्श माता पिता पुरस्कार वितरण सोहळ्यात बोलताना केले. त्यांच्या अध्यक्षतेखाली आणि पद्मश्री चैत्राम पवार यांच्या हस्ते हा सोहळा साजरा झाला त्यावेळी ते बोलत होते.

हरिजन सेवक संघाचे संस्थापक काकासाहेब नरहर बर्वे यांच्या स्मृती प्रीत्यर्थ दरवर्षी महाराष्ट्रातील (पान ४ वर)

विष प्राशन केल्याने ज्ये.नागरिकाचा मृत्यू

धुळे, दि.१४-शिरपूर तालुक्यातील वाडी गावातील अठ्ठ्याऐंशी वर्षीय ज्येष्ठ इसमाने काहितरी विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे.नातेवाईकांनी दिलेल्या खबरीनुसार, हरीचंद्र दगा पाटील (वय ८८)रा.वाडी यांनी काही तरी विषारी औषध पिवून घरातील खुर्चीवर बसुन राहिले. अत्यवस्थ वाटु लागल्याने त्यांना उपचारासाठी वाडी प्राथमिक आरोग्य केंद्र येथे नेण्यात आले. तेथून शिरपूर कॉटेज हॉस्पिटल येथे दाखल केले असता उपचार सुरू असतांना रविंद्र पावरा यांनी तपासून मयत घोषित केले. याप्रकरणी शिरपूर शहर पोलीस स्टेशनला अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली.

खान्देशातील ज्येष्ठ साहित्यिक प्रा.डॉ.पितांबर सरोदे यांचे निधन

नंदुरबार, दि.१४- नंदुरबार जिल्ह्यातील ज्येष्ठ साहित्यिक डॉ.पितांबर चिमणराव सरोदे यांचे शुक्रवारी सकाळी अकरा वाजून तीस मिनिटांनी एका खासगी हॉस्पीटलमध्ये निधन झाले. ते ९२ वर्षांचे होते.

१९६७ पासून ते लोकमान्य वाचनालयाच्या विविध पदांवर कार्यरत होते. नंदुरबार, शहादा, धुळ्यात त्यांनी वाचनालयाची चळवळ सुरु केली. हिंदी भाषेच्या प्रचार प्रसारामुळे त्यांना राष्ट्रपती पुरस्कार मिळाला होता. पुज्य साने गुरुजी व महात्मा गांधी या दोन विचारधारांच्या त्यांच्यावर प्रभाव होता. धुळ्यातील प्रा.डॉ.मु.ब. शहा, प्रा.पितांबर सरोदे व शहाद्याचे प्रा.डॉ. विश्वास पाटील यांची जोडी साहित्य क्षेत्रात प्रसिध्द होती. शहीद शिरीषकुमार मेहता व अन्य पाच बाल शहीद यांच्या स्मृती जागवण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न नंदुरबारकर कधीच विसरु (पान ४ वर)

आनंदाचा शिधा, शिवभोजन बंद! शिंदेकडील खात्यांना कमी निधी? भाजपकडून शिंदेना आवर घालण्याची योजना उघड: सूत्रांची माहिती!

मुंबई दि.१४ (किशोर आपटे)- शिवसेना शिंदे गटाकडे असलेल्या शिक्षण, आरोग्य, उद्योग, सार्वजनिक बांधकाम इत्यादी विभागात तरतूद कमी केली आहे. माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सुरु केलेल्या आनंदाचा शिधा या योजनेसाठी तर यंदा कोणतीही तरतूद करण्यात आली नाही. त्यामुळे ऐन अधिवेशन काळात होत असलेल्या होळी सणाला यंदा गरिबांना जीवनावश्यक वस्तुंचे वाटप झाले नाही. हा शिंदेशाहीचे राजकारण संपवण्याचा, त्याला सुरुंग लावण्याचा भाजपच्या मुख्यमंत्र्यांचा प्रयत्न असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

वित्त-अर्थमंत्री अजित पवार यांनी सोमवारी राज्याचा सुमारे ६ लाख कोटीचा अर्थसंकल्प सादर केला. त्यात राजकोषीय तूट सव्वा लाख कोटी तर ४५ हजार कोटी रूपये महसूली तुटीच्या शक्यतेमुळे राज्याची विदारक आर्थिक स्थिती स्पष्ट झाली आहे. शिवाय ८ कोटी ३९ हजार २७५ कोटीचे राज्यावर कर्ज आहे. जे एकूण कर्जक्षमतेच्या काठावर पोहोचले असल्याने आता नव्याने कर्ज घेतल्यास राज्य दिवाळखोरीत जाणे क्रमप्राप्त असल्याचे अर्थतज्ज्ञांचे मत आहे. मात्र असे असले तरी सुरू झाल्यापासून टिका होत असलेल्या लाडकी बहिण योजनेवर मात्र सरकारने आगामी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकीवर डोळा ठेवून हात सैल ठेवला आहे. विधानसभा निवडणुकीत महायुतीला यश मिळाले त्यात सर्वाधिक जागा भाजपने हुशारीने पदरात पाडून घेतल्यावर मुख्यमंत्रीपदावरुन शिंदे यांना वखुबी बाजुला घेतले आहे.

फडणवीस हिरो-शिंदे झिरो?

सूत्रांच्या माहितीनुसार देवेंद्र फडणवीस यांनी शासकीय अधिका-यांच्या मदतीने आता खरे हिरो असल्याचे स्पष्ट केले असून एकनाथ शिंदे यांच्या काळातील किंवा त्यांच्या मर्जीतील लोकांच्या विभागातील निर्णयांचा आढावा घेत त्यात अनेक चौकश्या, स्थगिती आणि काही योजनांच बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. लाडकी बहिण योजनेत लाभार्थी असलेल्या अन्य योजनात समावेश असणा-या महिलांची सुमारे ७ लाख नावे कमी करणे, एसटी महामंडळाच्या अध्यक्षपदावरून परिवहन मंत्र्यांना दूर करणे, एसटीच्या बस खरेदीचे कंत्राट रद्द करणे, आनंदाचा शिधा, शिवभोजन थाळी सारख्या योजना बंद करणे, आरोग्य विभागाच्या औषध खरेदीबाबत चौकशी नियुक्त करणे असा निर्णयांचा सपाटा लावण्यात आला आहे. मात्र हे सारे निर्णय एकमताने घेतले जात असल्याचे त्यांनी वारंवार उघडपणे स्पष्ट केले असून नाराजी किंवा असंतोषाच्या बातम्या माध्यमांतून जाणिवपूर्वक भांडणे लावण्यासाठी दिल्या जात असल्याचे म्हटले आहे.

कॉमन मॅनची प्रतिमा पुसण्याचा प्रयत्न?

भाजप विरोधीपक्षात असताना एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रीपदावरून पायउतार करत (पान ४ वर)

जयनगरमध्ये होळी सण साजरा प्रथमच पेटली लाकूडमुक्त होळी

जयनगर, दि.१४ (प्रतिनिधी) - शहादा तालुक्यातील जयनगर येथे वाजत - गाजत ग्रामपंचायत परिसरात होळी पेटविण्यात आली. वनश्री पुरस्कार प्राप्त गटनेता तथा उपसरपंच ईश्वर संतोष माळी यांच्या संकल्पनेतून यावर्षी प्रथमच लाकडांऐवजी होळीसाठी पूर्णता शेणाच्या गोवऱ्यांचा वापर करण्यात आला. गोवऱ्या जाळल्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होऊ नये म्हणून लाकडांची तोड करण्यात आली नाही. एकूणच पर्यावरणाचे रक्षण व्हावे म्हणून येथे प्रथमच गोवऱ्यांची होळी करण्यात आली.

फाल्गुन महिन्याच्या पौर्णिमेला येणारा हा सण वाईट आचार-विचारांना (पान ४ वर)

१४ रोजा १५	
१५ मार्च २४	१६ मार्च २४
इफ्तार	सहेरी
६.४२	५.२२

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -79,300 रु.+3% GST
सोने- 24 K -86,00 रु.+3% GST
चांदी- 01,0150 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

आपला महाराष्ट्र

निष्ठावान सेवादल सैनिकाची अखेर

खान्देशातील ज्येष्ठ सेवादल सैनिक, विद्वान साहित्यिक आणि शहीद स्मृती सह अनेक विधायक संस्थांचे मार्गदर्शक तथा संरक्षक प्रा.डॉ.पीताम्बर सरोदे यांचे काल वृद्धापकाळाने निधन झाले. त्र्यान्नव वर्षीय सरोदे सर भरपूर जगले आणि तृप्त मनाने त्यांनी इहलोकीची यात्रा संपवली. निसर्गाच्या नियमानुसार ते निघून गेलं असले तरी त्यांचे जाणे मनाला चटका लावून जाणारे आहे.कारण अनेकांचे जगणे सुकर करणारे आश्वासक नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे बघता येईल.त्यांचे अत्यंत निर्मळ मन सहजपणे दुसऱ्यांच्या दुःखावर फुंकर चालणारे होते. मित्रांवर निस्वार्थी आणि आत्मिय प्रेम करणारे व्यक्तिमत्व म्हणून त्यांची सर्वत्र ओळख होती.महाराष्ट्रातील जुन्या सेवादल सैनिकांना ते जवळून ओळखत होते. त्यांच्याशी पुरोगामी चळवळीतील कार्यकर्ते आणि नेत्यांचा सततचा संपर्क असायचा. चळवळी संबंधीचे कोणतेही काम असो महाराष्ट्रातील कार्यकर्ता नंदुरबार ला सरोदे सरांकडेच आधी येत असे.पुरोगामी चळवळीला नंदुरबारमध्ये बळ देण्याचे काम अखेर पर्यंत त्यांनी केले. फैजपूरहून नंदुरबारला ते जी.टी.पाटील महाविद्यालयात हिंदीचे प्राध्यापक म्हणून दाखल झाले. नंतर पी.एच. डी.झाले. हिंदी विभागाचे प्रमुख म्हणून त्यांची कारकीर्द अतिशय यशस्वी ठरली. त्याकाळात त्यांची निवड गुणवत्तेवर झाली होती. वशिल्या शिवाय गुणवत्ता हाच एक निकष त्यावेळी असायचा. पैसा तर गौणच होता. पैशांना स्थान नव्हते. नोकरी म्हणून सरोदे सरांनी प्राध्यापकी केली नाही. तर सैवा आणि गुरू म्हणूनच त्यांनी काम केले. त्यामुळे विद्यार्थी प्रिय प्राध्यापक या नात्याने त्यांचा लौकिक होता. अनेक विद्यार्थी त्यांनी असे घडविले की कुठेही गेले तरी खणखणीत नाणे ठरावे. अशीच सरांची शिकवणी होती. सरोदे सरांनी दीर्घकाळ वाचन चळवळीचे नेतृत्व केले. ग्रथालय चळवळ खान्देशात रूजविण्यासाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले.तेवढेच परिश्रम राष्ट्रभाषा प्रचारासाठी घेतले.विद्वान साहित्यिक डॉ.मु.ब.शहा यांच्या समवेत राष्ट्रभाषा प्रचार समितीचे कार्य आणि नाशिक विभागीय समितीचे अस्तित्व टीकवून ठेवण्यात त्यांनी पराकाष्ठा केली.अखेर पर्यंत ते या कामात व्यस्त होते. राष्ट्रसेवादल अखंड धुळे जिल्ह्यात जिवंत ठेवण्याचे बरेचसे श्रेय भाई डॉ.मु.ब.शहा यांच्या समवेत पीतांबर सरोदे यांनाही द्यावे लागेल. नंदुरबारमध्ये १४ ऑगस्टचे मध्यरात्री चे ध्वजवंदन त्यांनी कधी चुकवले नाही. निष्ठावंत सेवादल सैनिक म्हणून त्यांची ओळख होती.

धुळे –नंदुरबार जिल्ह्यात हिंदी मराठी साहित्य आणि गांधी–साने गुरूजींच्या विचारांच्या चळवळीत डॉ.पीतांबर सरोदे सर आणि डॉ.मु.ब.शहा, डॉ.विश्वास पाटील या त्रिमूर्तींची अमिट अशी छाप होती. भाईंनी स्थापन केलेल्या छात्र भारती या विद्यार्थी संघटनेत दोघेही अग्रेसर होते. भाईंच्या पेक्षा सरोदे सर वयाने मोठे असले तरी ते भाईंना गुरूस्थानी मानत. तिघांचा एवढा समन्वय होता की, एकही प्रकल्प किंवा निर्णय त्यांनी एकमेकांच्या संवादा शिवाय पूर्ण केला नाही. त्या माळेतला एक मणी काल गळून पडला आहे. राष्ट्रभाषा, राष्ट्र सेवादल,जिल्हा ग्रंथालय संघ, लोकमान्य टिळक वाचनालय, शहीद स्मृती, प्राध्यापक संघटना या संस्थांच्या संचालनात सरोदे सरांचे मोठे योगदान होते. सेवादलातील एसेम अण्णा, प्रा.ग.प्र.प्रधान, यदुनाथ थत्ते, सदानंद वर्दे, राजा मंगळवेढेकर, आदींशी त्यांचा निकटचा संबंध होता. १९६० साली ते नंदुरबारमध्ये आले. रेल्वेतील नोकरीची संधी सोडून हुतात्मा शिरीषकुमार आणि बाल शहिदांचे गाव आहे म्हणून त्यांनी नंदुरबारची निवड केली. सेवा निवृत्तीनंतर येथेच राहणे त्यांनी पसंत केले. टिळक वाचनालय, तेथे होणारे विविध कार्यक्रम, शहीद स्मृती, सेवादल हे त्यांचे उत्तर आयुष्यातील कार्यक्षेत्र होते. शहीद स्मृतीत दरवर्षी ९ सप्टेंबर रोजी बाल शहिदांना वंदन करण्यासाठी जे कार्यक्रम आयोजित केले जात त्यात महाराष्ट्रातील दिग्गज साहित्यिक, चळवळीतील कार्यकर्ते, विविध क्षेत्रातील नामवंतांना पाचारण करून नंदुरबारकरांना अनेक वर्षे सरांनी बौध्दिक मेजवानी उपलब्ध करून दिली. त्यासाठी नवी पीढी तयार केली.धुळे जिल्ह्याच्या विभाजनानंतर नर्मदा बचाव आंदोलनाचे केंद्र नंदुरबार कडे गेले. तेव्हा मेधाताईंना सरोदे सर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी पाठबळ देत आंदोलन जिवंत ठेवण्यासाठी मदत केली.

हिंदीतील उत्कृष्ठ कार्याबद्दल पीतांबर सरोदे यांना राष्ट्रपती आर.के नारायण यांच्या हस्ते गंगाशरणसिंह पुरस्कार मिळाला होता. राष्ट्रपती. भवनात हा सन्मान त्यांना मिळाला. आणिबाणी नंतरच्या काळात जनता पार्टीत ते सक्रिय होते. सहकार महर्षी पी.के.अण्णा पाटील, ॲड.रमणभाई शहा, मुगटभाई शहा, नवल अण्णा, नथुभाई कासार यांच्या समवेत त्यांनी जनता पार्टीत योगदान दिलेले आहे. पी.के.अण्णाच्या चरित्र लेखनात त्यांची प्रमुख भूमिका राहिलेली आहे. बाल शहिदांच्या पराक्रमावर त्यांचे नंदुरबाचे अमर शहीद या नावाचे पुस्तक सर्वदूर पोहचले.त्यामुळे महाराष्ट्रात असंख्य जाणकारांना हुतात्म्यांच्या बलिदानाविषयीची ओळख झाली. साने गुरूजींच्या संदर्भात ऐंशी कळवळ्यांची नाती असेच सरोदे सरांच्या बद्दल म्हणावे लागेल.गुरूजींचे नाव काढले तरी ते भावना विवश होत असत. श्यामची आई असेल किंवा भारतीय संस्कृती असेल सर भरभरून बोलत. गुरूजींच्या ख–या धर्माचे ते निःसिम पाईक होते. एकेकाळी प्राचार्य जोंधळे यांच्या निलंबन प्रकरणी त्यांनी मोठा संघर्ष केला होता. नोकरीचीही चिंता त्यांनी या प्रकरणात केली नव्हती. प्रकरण राज्यभर गाजले होते. सरोदे सरांची पत्रकारितेची कारकीर्द देखील वाखाणण्याजोगी होती. स्वतंत्र भारत, जनशक्ती दैनिकातून त्यांनी विपुल लेखन केले. त्यांची विधायक पत्रकारिता एखाद्या मंद तेवत राहणाऱ्या पणती प्रमाणे होती. कोणत्याही वळणावर ती वादग्रस्त ठरली नाही. त्यांचे लेखन कार्य अखेर पर्यंत चालू होते. अशी व्यक्तिमत्त्वे आता शोधून सापडणार नाहीत. झाले बहु, होतील बहू परंतु या सम हाच असे सरोदे सराबद्दल म्हणता येईल. त्यांना जन्मजात मिळालेल्या बौध्दिक क्षमतेतून अनेक ग्रंथ निर्माण झालेले आहेत ते समाजाला मार्गदर्शक ठरतील. त्यांच्या स्मृतिना विनम्र प्रणाम.

परिचर्या प्रशिक्षण महाविद्यालयात श्रवण व महिला दिन उत्साहात

धुळे, दि.१४- परिचर्या प्रशिक्षण महाविद्यालय,जिल्हा रूग्णालय धुळे येथे जागतिक श्रवण व महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दत्ता देगावकर यांनी भुषविले.

सावित्रीबाई फुले फ्लॉरेन्स नाईटिंगेल यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला. यावेळी विविध स्पर्धांमधील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. मन:स्थिती बदला स्वत:ला सक्षक करा आणि कान, नाक व श्रवण संबंधित काळजी सर्वांसाठी वास्तव बनवा या थिमला आपण वास्तवात आणण्याचा प्रयत्न करू. जगभरात सहा कोटींच्यावर श्रवणदोषाने बाधित आहेत. श्रवण दोषामुळे संवाद साधण्यात अडथळे निर्माण होतात. परिणामी दुरावा निर्माण होतो. श्रवण दोष ओळखण्यासाठी प्रत्येक बाळाची जन्मल्यानंतर एक महिन्याच्या आत श्रवण चाचणी करणे बंधनकारक आहे. असे बहुमोल मार्गदर्शन नाक, कान, घसा तज्ञ डॉ.संजय शिंदे यांनी यावेळी केले. पुढे बोलतांना ते म्हणाले की, जागतिक महिला दिनीच नव्हे तर इतर दिवशीही महिलांच्या योगदानाचा आणि अधिकारांना सातत्याने आदर केला पाहिजे. बदलत्या काळानुसार स्त्रीयांचे स्थान बळकट होत गेले आहे. शैक्षणिक, राजकीय, क्रीडा, उद्योग व्यवसायातच नव्हे तर सर्वत्र महिला आपले कर्तृत्व सिध्द करत आहे. महिलांचे हक्क व संरक्षणाची आपण शपथ घेतली पाहिजे असेही डॉ.शिंदे यांनी स्पष्ट केले.

डॉ.दत्ता देगावकर यांनी आपले अध्यक्षीय भाषणात सांगितले की, महिलांनी सर्वच क्षेत्रांत आपला ठसा उमटवला आहे. महिलांना समान संधी, सन्मान देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. लिंग समानतेसाठी वेगाने काम करण्याची वेळ आली आहे. महिलांबाबत समाजात अनेक आव्हाने दिवसेंदिवस उभी राहत असली तरी सक्षमपणे पेलण्याची ताकद महिलांमध्ये आहे. असे मत त्यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाप्रसंगी निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.विवेक जाधव, सहाय्यक अधिसेविका सरला शिंदे, वंदना मोरे, परिचर्या महाविद्यालयाचे प्राचार्य मयुर गिते, पाठ्यनिर्देशिका सोनिया रोकडे, अनिता बनाते, रेखा माळी, भक्ती महाजन, अधिपरिचारिका कौशल्या राठोड, राजश्री कस्तुरे, ऑडीओलॉजिस्ट डॉ. राहुल साळुंखे, सुशांत साळुंखे, ऑडिओमॅट्रीक सहाय्यक ललित खैरनार तसेच परिचर्या प्रशिक्षण महाविद्यालयातील विद्यार्थीनी उपस्थित होत्या.

शिरपूरच्या एच.आर.पटेल फार्मसी व अहमदाबादच्या क्लीन्था रीसर्च लि.यांच्यात झाला सामंजस्य करार

शिरपूर, दि.१४- शिवपुर एज्युकेशन सोसायटी संचलित एच. आर. पटेल फार्मसी व क्लीन्था रीसर्च लि. अहमदाबाद या दोन्ही संस्थांमध्ये सामंजस्य करार करण्यात आला.यामुळे औषध संशोधन व औद्योगिक सहकार्याच्या नव्या वाटा खुल्या झाल्या आहेत अशी माहिती प्राचार्य डॉ.एस.बी. बारी यांनी दिली.

क्लीन्था रिसर्च लि. ही एक अग्रगण्य क्लिनिकल रिसर्च ऑर्गनायझेशन असून जी प्रारंभिक टप्प्यातील क्लिनिकल ट्रायल्स, पर्यावरणीय एक्स्पोजर चेंबर्स आणि प्रगत बायो-ॲनालिटिकल प्रयोगशाळांमध्ये विशेष कौशल्य असलेली संस्था आहे. या सामंजस्य कराराद्वारे क्लिनिकल आणि फार्मास्युटिकल सायन्समध्ये संशोधन, विद्यार्थी प्रशिक्षण आणि ज्ञान देवाणघेवाण यासाठी एक धोरणात्मक भागीदारी प्रस्थापित करण्यात येणार असून त्याद्वारे महाविद्यालयाचे विद्यार्थी क्लीन्था रिसर्चच्या माध्यमातून क्लिनिकल ट्रायल्स, बायो-ॲनालिटिकल स्टडीज आणि रेग्युलेटरी कंप्लायन्स यासारख्या अत्याधुनिक संशोधन पद्धती शिकण्यास सक्षम होतील. क्लीन्था रिसर्च तज्ज्ञ मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण कार्यक्रम, कार्यशाळा आणि अतिथी व्याख्याने आयोजित करेल. ज्यामुळे विद्यार्थ्यांना क्लिनिकल रिसर्च, जीवशास्त्र आणि इन्फॉर्मेशन स्टडीज, वैद्यकीय सेवा आणि बायोमेट्रिक्स यासारख्या क्षेत्रांमध्ये व्यावहारिक ज्ञान मिळेल. या सहकार्यामुळे विद्यार्थ्यांना क्लियंथा रिसर्चच्या जागतिक संशोधन केंद्रांमध्ये इंटर्नशिप आणि संभाव्य रोजगाराच्या संधी मिळतील. अशी माहिती कंपनी चे जनरल व्यवस्थापक नयन प्रजापती व जय सोनी यांनी दिली.

या सामंजस्य कराराच्या माध्यमातून आम्हाला व्यावहारिक ज्ञान, संशोधन कौशल्ये आणि जागतिक स्तरावर काम करण्याची संधी मिळते असा अभिप्राय उपस्थित विद्यार्थ्यांनी दिला. महाविद्यालयाने आतापर्यंत विविध संस्था सोबत करार केले आहेत. त्यात इन्फोसिस, रुबिकॉन, झायाडस लाईफ सायन्स इत्यादि नामांकित संस्था असून त्यामुळे विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रातील तज्ञाशी सवांद साधता येतो व त्यांना भविष्यात लागणाऱ्या कौशल्यांचा अभ्यास करण्याची व नोकरीची संधी मिळते.कार्यक्रमासाठी डॉ. पी.बी. निनावे, प्लेसमेंट प्रमुख डॉ. व्ही.के. चटप, प्रा.डी.एम. पाटील, प्रा.व्ही.एस. बागुल, प्रा.एस.के. आमले, प्रा. झबी खाटिक, प्रा. विश्वेश उपासनी, प्रा.कल्याणी राजपूत, प्रा.संजना चोरडिया यांनी प्रयत्न केले. याबद्दल संस्थाध्यक्ष आमदार अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, उद्योगपती चिंतनभाई पटेल, सचिव सौ. रेषा पटेल, सर्व संचालक, प्राचार्य डॉ.बारी यांनी समाधान व्यक्त केले.

नंदुरबार जिल्हा भाजप उपाध्यक्षपदी आशाताई पाडवी यांची नियुक्ती

अक्कलकुवा, दि.१४ (प्रतिनिधी)- येथील स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा श्रीमती आशाताई नरेंद्रसिंग पाडवी यांची नंदुरबार जिल्हा भारतीय जनता पार्टीच्या उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशा नुसार व महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष विजय चौधरी व नंदुरबार जिल्हाध्यक्ष निलेश माळी, ड.विक्रम रघुवंशी आदींच्या उपस्थितीत आशाताई पाडवी यांना नियुक्ती पत्र देण्यात आले. या नियुक्ती पत्रात म्हटले आहे की, देशाचे पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी यांच्या ध्येय धोरणानुसार भारतीय जनता पार्टीला मजबूत करण्यासाठी व बलशाली, आत्मनिर्भर भारत बनविण्यासाठी आपण प्रयत्नशील राहणार तसेच नंदुरबार जिल्ह्यातील प्रत्येक कार्यकर्त्यापर्यंत पोहोचून भारतीय जनता पार्टीचे संघटन अधिक मजबूत करण्यासाठी आपण प्रयतक्शील राहाल म्हणून आपली नियुक्ती करण्यात आली असल्याचे म्हटले आहे.

स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा श्रीमती आशाताई नरेंद्रसिंग पाडवी यांची नंदुरबार जिल्हा भारतीय जनता पार्टीच्या उपाध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

एस.व्ही.के.एम. फार्मसीमध्ये वार्षिक क्रीडा मेळावा उत्साहात

धुळे, दि.१४- येथील एस.व्ही.के.एम. इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी मध्ये वार्षिक क्रीडा मेळावा उत्साहात संपन्न झाला.

मनासाठी संगीत, शरीरासाठी खेळ या ध्येयवाक्याला लक्षात ठेवून, विद्यार्थ्यांच्या बहुमुखी विकासासाठी आणि त्यांना खेळात उत्कृष्टता मिळवून देण्यासाठी वार्षिक क्रीडा मेळावा श्री विले पार्ले केळवणी मंडळच्या फार्मसी इन्स्टिट्यूटमध्ये अमर्याद आनंदी व उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. क्रीडा मेळावा सह-अभ्यासक्रम उपक्रमांचा एक भाग आहे. या क्रीडा मेळाव्याचे उद्घाटन प्राचार्य डॉ. समीर गोयल यांच्या हस्ते झाले. प्राचार्य डॉ. समीर गोयल यांनी विद्यार्थ्यांना क्रीडा स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या आणि शरीरसंपदा व मानसिक तंदुरुस्ती वाढवण्यासाठी खेळाचे महत्त्व पटवून दिले. उत्साह, उमेद आणि खेळाडूवृत्तीने भरलेली ही क्रीडा स्पर्धा महाविद्यालयाच्या क्रीडा संस्कृतीला बळकटी देणारी ठरली. वार्षिक क्रीडा स्पर्धा महाविद्यालयाच्या मैदानावर योग्य आणि शिस्तबद्ध पद्धतीने आयोजित करण्यात आल्या. क्रीडा महोत्सवात क्रिकेट, ॲथलेटिक्स, टेबल टेनिस, बॅडमिंटन, बुद्धिबळ, कॅरम, गोळा फेक (शॉटपुट), मॅरेथॉन या सारख्या विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी आपल्या कौशल्यांचे उत्तम प्रदर्शन करत स्पर्धात्मक वातावरण निर्माण केले. विजेत्यांना पदके व प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले.

शहाद्यात श्री शिव महापुराण महाकथेचे आयोजन : आ.पाडवी

शहादा, दि.१४ (का.प्र.)- शहादा व तळोदा मतदारसंघातील भाविक भक्तांची अपेक्षा व मागणी लक्षात घेऊन शहादा येथे मोहिदा तश शिवारातील शंभर एकर जागेवर दि.१ ते ५ एप्रिल दरम्यान श्री शिव महापुराण महाकथेचे आयोजन करण्यात आले आहे.आयोजन समिती व भाविक भक्तांच्या सहयोगाने कोणत्याही व्हिआयपी व्यवस्थेशिवाय कथा सुरळीत पार पाडली जाणार आहे, असा विश्वास आमदार राजेश पाडवी यांनी व्यक्त केला आहे.

सिहोर (मध्यप्रदेश) येथील राष्ट्रीय कथाकार पूज्य पंडित प्रदीपजी मिश्रा यांच्या श्री शिव महापुराण कथेचे आयोजन शहादा येथील मोहिदा तश शिवारातील तहसील कार्यालया नजीकच्या शंभर एकर जागेत दि.१ ते ५ एप्रिल दरम्यान आयोजन करण्यात आले आहे.कथेच्या नियोजनासंदर्भात माहिती देण्यासाठी येथील खरेदी विक्री संघाच्या कार्यालयात पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी खरेदी विक्री संघाचे चेअरमन प्रा. मकरंद पाटील, ज्येष्ठ नेते शशिकांत वाणी, उद्योगपती श्यामभाऊ जाधव, अजय गोयल यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी माहिती देतांना आमदार राजेश पाडवी म्हणाले, परिसरातील भाविकांची मागणी व अपेक्षा लक्षात घेऊनच महिन्यापूर्वी पूज्य पंडित प्रदीप मिश्राजी यांची भेट घेतली. त्यांनी आपल्याला लगेच कथा आयोजनाची संधी उपलब्ध करून दिली आहे.या पाच दिवसीय कथेला सुमारे दहा लाख भाविक उपस्थित राहण्याचा अंदाज असून उन्हाळ्याचे दिवस असल्याने त्यादृष्टीने नियोजन केले जात आहे. सभा मंडप पूर्व पश्चिम ठेवण्यात येणार असून चारही दिशेला प्रवेश द्वार असतील. त्याशिवाय चारही दिशेला वाहन पार्किंगची व्यवस्था असेल. शिरपूर व साक्री येथे गत काही महिन्यांपूर्वी झालेल्या कथेला शहादा तालुक्यातील भाविकांची मोठी संख्या उपस्थित असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्याअनुषंगाने शहादा येथे आयोजित कथेस मोठ्या संख्येने भावीक उपस्थित राहणार असा अंदाज आहे.

अग्रसेन चौकात पर्यावरणपूरक होळी

धुळे, दि.१४- शहरातील अग्रसेन चौक येथे कोळवले शिवमच्या समोर सालाबादाप्रमाणे यंदाही पर्यावरणपूरक होळीचे दहन करण्यात आले. इंदिरा काँग्रेसचे उपाध्यक्ष मुकुंद कोळवले, सौ.सुनंदा कोळवले, जितेश कोळवले, प्राजे। कोळवले, सुशांत कोळवले, चि.ओजस, संचिता, संपूर्ण परिवाराच्या उपस्थितीत होलिकादहन करण्यात आले. होलिकादहन झाल्यानंतर परिसरातील नागरिकांनी होळीची पूजा करुन नैवेद्य दाखविला. विशेष म्हणजे प्रदूषणरहीत होळी यावेळी पेटविण्यात आली.

पथदिवे बंद

धुळे- पांझरा किनारी असलेला शिवाजीरोड, सावरकर पुतळा ते ग्रंथालय परिसरपर्यंत दररोज पथदिवे बंद राहत असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

प्रकाश में आज आग से खेलेंगे



BOOKING OPENS

ज्योती सिनेमा 3D JYOTI 2K CHRISTIE DOLBY DIGITAL

ता. १४ से रोज ४ खेल टा. ११:५०,२:५०,६,९बजे | छावा

तिकीट दर	गोल्ड	सिल्वर	बाल्कनी
	८० रु.	८० रु.	१३० रु

ONLINE TICKET BOOKING OPEN book my show

9422789999/9823177599 Jyoticinemadhule.

MANOHAR CHITRA MANDIR, DHULE ता. 14 से 4 Show

CHHAAVA (u/a) 11:45am,2:45,6&9:15PM

Ticket	बाल्कनी	प्लेटिनियम	गोल्ड	सिल्वर
Ticket Rate	₹150	₹112	₹100	₹100

www.facebook.com/ManoharBigCinemasIndia

BookMyShow Paytm 8007232021 232021/233421

शब्दकोडे क्रमांक.२१०८



आडवे शब्द : १.मुलगा ३. दर्द ६.राग ७.हूलकावणी ८.काहीसा भरडा १०.मुलांच्या भावविश्वातील पंख असलेली काल्पनिक स्त्री ११.मांत्रिकाने दिलेली विभुती १३.वसाहत १५.उघडा १६.बिजागीर १७.कलंक लागलेला १९.नीर २०.हिंदीत-क्षमता २१.फुलातील पराग कण २५.उपवन २६.एक गोड पेय २८.इंग्रजीत- शाळेत भरली जाणारी ठराविक रक्कम २९.इज्जत ३०.लेहंगा ३१.आव ३२.मेजवाणी ३४.मादक स्टाईल ३५.चहाचा ठेला ३७.नुतन ३९.तीर ४०. रतिक्रिडेस सदैव उद्युक्त असलेला ४३.मेघ ४५.नरेश ४६.शुष्क ४७.हिंमत ४८.रीघ ४९.दरारा ५०.हिंदीत-पुन्हा ५१.इंग्रजी कालगणनेतील पाचवा महिना उभे शब्द : १.'..भटोले'एक पंजाबी खाद्य २.पुण्यात कृषी विद्यापीठ असलेले ठिकाण ४.पोलिस अधिकारी ५.एक लांबसडक फळ भाजी ६.भेग ९.हिंदीत-स्वस्त १०.पळ काढणे ११.काळोख १२.लफडा १४.धंद्यातील तेजी १५.'.. गवाह'अमिताभ बच्चन यांचा एक सिनेमा १८.नदीच्या पाण्यासोबत वाहून आलेली सुपीक माती २२.एखादयावर सोपवलेली महत्वाची कामगिरी २३.पुढे पुढे सरकणारा २४.सुरांची केलेली मनमोहक गुंफण २६.पावसाची झड २७.रब-उलट लिहा २९.मज्जाव ३०.नाश ३१.सुकामेव्यातील एक जिन्नस ३३.उत्तर प्रदेशातील एक शहर ३४.काळानुसार न आलेली ३६.पंख ३८.खुंट-विरुदध ४१.हिंदीत-छेद, पुरावा ४२.नासलेले ४४.सांडपाणी वाहून नेणारी पळी ४६.चंद्राची बारीक लकेर

शब्दकोडे क्रमांक.२१०७ चे उत्तर

सु	नि	ल	द	त्त		म	ग	रू	र		सा
ता		ढा	स		क	णी		त	ला	स	री
र	मी		रा	न	टी		सां	बा		पा	पा
	ग	त		ज्म		फु	गा		ट		ट
ख		री	स		सं		वा	टे	क	री	
ट	र	का		आ	वे	ग		क	ला		आ
प	र		स	न	द		ना	डी		का	म
ट		ग	वा		ना	र	द		स	म	दा
	क	रा		सु		म		कि		गा	र
प्र		डा	म	डौ	ल		स	र	दा	र	
सं	थ		जा	ल		का	ट	को	न		सा
ग		अं	क		पा	ढा		ळ		मे	थी

शेतकरी खऱ्या अर्थाने दातृत्ववान व जगाचा पोशिंदा! शेतकऱ्यांच्या कार्यशाळेत प्रा.संजय जाधव यांचे प्रतिपादन

शहादा, दि.१४ (प्रतिनिधी) - शेतकरी राजाला शेतीसाठी प्रोत्साहित करण्यासाठी सामाजिक वातावरण उपलब्ध करून देण्याची जबाबदारी समाजातील सर्व घटकांची असून शेतकरी हा खऱ्या अर्थाने दातृत्ववान व जगाच्या पोशिंदा आहे असे प्रतिपादन सातपुडा शिक्षण संस्थेचे सचिव प्रा.संजय जाधव यांनी केले.

म्हसावद तालुका शहादा येथे द्वारकामाई सभागृहात वसंतराव नाईक महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत गुणवत्ता आश्वासन कक्ष व उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव अध्ययन विस्तार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय शेतकरी सहायता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते त्यात प्रा.संजय जाधव बोलत होते. यावेळी महाराष्ट्र कृषिभूषण पुरस्काराने सन्मानित प्रगतिक शेतकरी हिरालाल पाटील, साईबाबा भक्त मंडळ संस्थेचे अध्यक्ष रमाकांत चौधरी, सचिव प्रसन्नकुमार बंब, शहादा पंचायत समिती माजी सभापती डॉ.सुरेश नाईक, शहादा कृषी मंडळ अधिकारी संदीप पाटोळे, सूक्ष्म अन्न प्रक्रिया विभागाचे एस.बी.बागुल, श्याम सोनार, प्रशिक्षण संस्थेचे प्रशासकीय प्रमुख प्रा.डॉ. हिमांशू जाधव, प्राचार्य दुर्यो धन राठोड उपस्थित होते.

प्रा.संजय जाधव यांनी शेतीत रासायनिक खतांच्या वापर वाढल्याने मातीची प्रतवारी खराब झालेली आहे. मातीची चांगली गुणवत्ता निर्माण करण्यासाठी नैसर्गिक खताचा वापर केला गेला पाहिजे. सेंद्रिय शेतीकडे शेतकऱ्यांच्या कल वाढत चाललेला आहे. शेतकरी सुखी तर जग सुखी म्हणून शेतकऱ्यांना शेतीसाठी प्रोत्साहित करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांचा मालाला वाढीव भाव दिला गेला पाहिजे. शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी अशा कार्यशाळा उपयुक्त ठरत असतात असे सांगून शुभेच्छा दिल्या.यावेळी डॉ. सुरेश नाईक, डॉ.किशोर पाटील, शहादा कृषी मंडळ अधिकारी संदीप पाटोळे यांनी देखील मनोगत व्यक्त केले. एक दिवसीय कार्यशाळेला सोनामाई शिक्षण संस्थेच्या सचिव जिल्हा स्काऊट आयुक्त वर्षा जाधव यांनी शुभेच्छा दिल्या.

महाराष्ट्र परीट (धोबी) सेवा मंडळ प्रदेशाध्यक्षपदी शिर्डीचे खंडेराव कडलग यांची बिनविरोध निवड

शिरपूर, दि.१४- महाराष्ट्र परीट (धोबी) सेवा मंडळचे राज्यस्तरीय महाअधिवेशन नुकतेच साईबाबा यांच्या पुण्यभूमी शिर्डी येथे हजारो समाज बांधवांच्या उपस्थितीत मोठ्या दिमाखात पार पडले. या मेळाव्यात महाराष्ट्र परीट (धोबी) सेवा मंडळ प्रदेशाध्यक्षपदी खंडेराव आनंदराव कडलग रा.शिर्डी यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

मावळते प्रदेशाध्यक्ष राजेंद्र खैरनार यांनी नवनियुक्त प्रदेशाध्यश खंडेराव कडलग यांचाकडे प्रदेशाध्यक्षपदाची सुत्रे दिलीत. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी दिल्ली येथील सुदर्शन न्यूज चॅनल अध्यक्ष सुरेश चव्हाणके होते. तर प्रमुख मान्यवर राष्ट्रीय अध्यक्ष कृष्णकुमार कनोजिया, राष्ट्रीय उपाध्यक्ष एकनाथराव बोरसे, ज्येष्ठ मार्गदर्शक राजेंद्रसेठ आहेर, प्रदेशाध्यक्ष राजेंद्र खैरनार, हरियाणाचे अमित खत्री, महाराष्ट्र परीट (धोबी) सेवा मंडळ प्रदेश उपाध्यक्ष अरुण धोबी, प्रदेशाध्यक्ष निवड समिती अध्यक्ष मुरलीधर शिंदे, महिला प्रदेशाध्यक्षा सौ.सिमा रंधे, कार्याध्यक्ष सौ. सुषमाताई अमृतकर, माजी युवा प्रदेशाध्यक्ष संतोष भालेकर, युवा प्रदेशाध्यक्ष रवी राऊत, तुषार रंधे, लॉन्ड्री संघटना प्रदेशाध्यक्ष सुनील दळवी, कार्याध्यक्ष श्रीरंग मोरे, नामदेव वाघमारे, तंटामुक्ती समिती प्रदेशाध्यक्ष ज्ञानेश्वर गवळी, सुधीर खैरनार, उपाध्यक्ष प्रा.सदाशिव ठाकरे, महासचिव रामदास शिंदे, संतोष सवतीरकर, बळवंतराव साळुंखे, शांतीलाल कारंडे, मनोज यादव, किरण बांदेकर, श्रीमती विमलताई खंडाळे सौ.वैशाली राऊत, सौ. कल्पना गायकवाड आदी प्रमुख मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. महाअधिवेशन यशस्वीतेसाठी अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष सुनील फंड, संजय जगताप, गोविंद राऊत, दीपक पवार, गोरख राऊत, किशोर गवळी, दत्ता हजारे, गौरव जाधव, रवींद्र राऊत, राजेंद्र फंड, अनिल देसाई, सुधाकर वाघ, सुनील निकम, अंबादास राऊत, संतोष जाधव, पोपटराव शिंदे, शिवा राजगिरे, दिगंबर देसाई, रितेश राऊत, प्रसाद निकम, अनिल देसाई, मनोज बर्वे, मयूर शिरसाट, मिलिंद कडलग, सारिका फंड, शीतल शिंदे, लता दळवी, नमिता भागवत, कावेरी राऊत, सुनंदा कडलक, चित्रा राऊत, अनिता हजारे, मोनिका राऊत व अहिल्या नगर जिल्ह्यातील सर्व समाज बांधवांनी परिश्रम घेतलेत.

जाहीर नोटीस

तमाम जनतेस, सर्व बँका, सर्व वित्तीय पतसंस्था, यांसी जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, **मिळकत वर्णन-** तु.जि.धुळे, पो.तु.ता.धुळे, जि.प. व ता.पं.स.धुळे, मौजे धुळे येथील धुळे म.न.पा हददीतील स नं ४७६/२ अपैकी प्लॉट नं २० यांसी एकूण क्षेत्र २२१ चौमी, बखळ प्लॉट यांसी विस्तारित सिसनं ८४२१ यांसी चतुसिमा व मापे पुर्वेस- १७ मी, रस्ता, पश्चिमेस-१७ मी, प्लॉट नं २१, दक्षिणेस-१३मी, रस्ता, उत्तरेस- १३ मी, प्लॉट न १९, येणेप्रमाणे वर्णनांचे चतुसिमे आंतील उपरोक्त बखळ प्लॉट मिळकत मालक आसाराम लक्ष्मणजी भाटी रा.भाउ नगर विरार वेस्ट मुंबई ता जि मुंबई यांनी आमचे अशिल यांना उपरोक्त मिळकत गाळा अंगभुत व तदंगभुत वस्तुसह कायमस्वरूमी विक्री देणेबाबत सौदा करार केला असून बयाणा रक्कम स्विकारली असून निर्बोज व निर्वेध आहे असे सांगितले आहे. उपरोक्त मिळकतीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध, गहाण, तारण, वहिवाट, कुळ, जामीन, जप्ती, टांच, वारस, बक्षीस, बोजा, सौदा, इ. बाबत हरकत असल्यास प्रस्तुतची जाहीर नोटिस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आंत खालील दिलेल्या पत्यावरउपरोक्त मिळकत बाबत प्रत्यक्ष हरकतीसोबत योग्य तो कागदोपत्री पुरावा सादर करून शहानिशा करून दयावी. टपाल व फोनवर परस्पर हरकत मान्य होणार नाही मुदतीत हरकत न आल्यांस आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील मिळकतीबाबत मुदती नंतर आलेल्या हरकतीचा विचार केलां जाणार नाही. ते आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

प्रस्तुतची जाहीर नोटीस अशिलांनी दिलेल्या माहिती व सांगणेनुसार आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

दिनांक- १४/०३/२०२५.

ॲड.किशोरकुमार एस.शर्मा
४४ब, गुरूकुंज, जयशंकर कॉलनी, चाळीसगांव रोड, धुळे.
मो.नं.९९६०२९३६७०

जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन- मौजे धुळे म.न.पा. हद्दीतील सि.स.नं.२७१२/ब चे एकूण क्षेत्र ३०.९० चौ.मी. सत्ताप्रकार अ यात कडीपाट धाब्याचे बांधीव घर नळ व वीज कनेक्शनसह तुम्हास कायम खरेदी देण्याचा सौदा केला तो आमचे मालकीचा बांधीव घराची चतुसिमा मंजुर नकशा प्रमाणे

वर नमूद वर्णन केलेला बांधीव घर/मिळकत ही १) दिपाली अरुण देवकर २) चंद्रलेखा शिवाजी शेलार ३) छायाबाई एकनाथ जाधव सर्व मुळ रा.धुळे यांचे मालकीचे व प्रत्यक्ष कबजे ताबे उपभोगातील आहे आमचे अशिल यांनी सदर बांधीव घर/मिळकत खरेदी करण्याचा सौदा केलेला आहे. सबब आमचे अशिल वरील मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहेत.

वर नमूद मिळकतीवर नमूद केलेल्या मालका व्यतिरिक्त इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, तारण, टाच, बोजा, कर्ज, खरेदीविक्री, करार, हस्तांरतण हिस्सा, व्यवहार, अधिकार अगर हितसंबध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आंत आमचे खालील पत्यावर लेखी व मुळ कागदपत्रांसह हरकत नोंदवावी परस्पर वर्तमानपत्रात जाहीर केलेली कोणतीही हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

वरील कालावधीत कुणाचीही कोणतीही हरकत न आल्यांस वरील मिळकत ही निर्बोज व निर्वेध आहे असे गृहित धरून आमचे अशिल वर नमूद मिळकतीचा अंतिम व्यवहार पूर्ण करतील. आणि त्यानंतर कोणतीही तक्रार आमचे अशिलावर व सदर मिळकतीवर बंधनकारक असणार नाही यांची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहिती व सांगणेवरून आमचे मार्फत दिली असे.

दिनांक- १४/०३/२०२५.

ॲड.लखमीचंद अ.गुजर
ॲडव्होकेट व नोटरी
ग.नं.२, घर नं.३३२६, गुल्लावाडा, धुळे.
मो.नं.९४२३४९३०८९

जिल्हा परीविक्षा आणि अनुरक्षण संघटना, मुलांचे निरीक्षणगृह व बालगृह धुळे व कै. रेऊबाई सखाराम केले मुलींचे निरीक्षण गृह व बालगृह, साक्री रोड, धुळे.

अजेंडा

दि. १२/०३/२०२५

(केवळ सभासदांसाठी)

प्रति.
सभासद मा. श्री. श्रीमती --------

मुलां-मुलींचे निरीक्षण गृह व बालगृह साक्री रोड, धुळे या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा दि. २५/०३/२०२५ वार मंगळवार राजी दुपारी ठिक १०.०० वाजता मा. चेअरमन पितांबर लालचंद महाले यांच्या अध्यक्षतेखाली मुलांचे निरीक्षणगृह व बालगृह धुळे या संस्थेच्या सभागृहात आयोजित केली आहे. तरी सदर सभेस आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.

सभेचे विषय

१) दिनांक २८/०३/२०२३ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) संस्थेचा सन २०२३-२०२४ व २०२४-२०२५ वर्षाचे वार्षिक अहवाल मंजूर करणेबाबत निर्णय घेणे.
३) संस्थेच्या सन २०२३-२४ वर्षाचा हिशोब व सनदी लेखापाल यांनी तपासलेल्या जमा खर्चाच्या तक्त्यांना मंजूरी देणे.
४) कार्यकारिणीच्या मंडळाने संमत केलेल्या सन २०२४-२५ व २०२५-२६ च्या अंदाज पत्रकास मंजुरी घेणे.
५) पुढील आर्थिक वर्षाकरिता सनदी लेखापाल यांची निवड करणे.
६) मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयाबाबत चर्चा करुन निर्णय घेणे.

टीप :-

१) सभेच्या निर्धारित वेळी आवश्यक कोरम पूर्ण नसल्यास कोरम सभा अभावी अर्धा तास तहकूब केली जाईल. सदर तहकूब सभा निर्धारित तारखेला अर्ध्या तासाने त्याच ठिकाणी घेण्यात येईल. या सभेस कोरमची आवश्यकता राहणार नाही.
२) संस्थेचे वार्षिक अहवाल संस्थेच्या सभासदांना कार्यालयात कार्यालयीन वेळेत पाहता येईल या अहवालाबाबत काही प्रश्न सभासदांना विचारायचे असतील तर त्यांनी सात दिवस अगोदर संस्थेस लेखी स्वरुपात कळवावे. त्यानंतर येणाऱ्या प्रश्नाचा विचार संस्थेत करता येणार नाही.

सही.....
डॉ. एस. टी. पाटील
मानद सचिव

CHANGE NAME

MY OLD NAME WAS **PATIL NITA NAMDEO** AND **NEETA NAMDEV PATIL** BOTH ARE SAME AND BELONGS TO ME AND MY NEW NAME IS **NEETA AJIT PAWAR**

ADD- 4, YOGKSHEM SHASKIY COLONY, WADI BHOKAR ROAD NEAR, DIN BANDHU SCHOOL, DEVPUR, DHULE-424002

धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. धुळे

मुख्य कार्यालय, गरुडबाग, धुळे

KYC/अनियमित खाते (Inoperative A/C's) तात्काळ नियमीत करणे बाबत

जाहीर आवाहन

धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील बँकेचे सर्व ग्राहक ठेवीदारांना विनंती करण्यात येते की, ज्या खातेदारांनी आपल्या खात्याची KYC (Know Your Customer) अद्ययावत केली नसेल अशा सर्व खातेदारांनी आपले खाते असलेल्या शाखेशी संपर्क करुन खात्याची KYC पूर्ण करावी. (अदा. अद्ययावत आधार कार्ड, पॅन कार्डची झेरॉक्स प्रत, मोबाईल नंबर व अद्ययावत संपूर्ण पत्त्यासह) व खातेदारांनी आपल्या खात्यावर वारस (नॉमिनी) लावला नसल्यास वारस लावावा. तसेच खातेदारांनी खात्यावर बऱ्याच कालावधीपासून (१० वर्षापासून) व्यवहार केला नसेल अशी सर्व खाती रिझर्व्ह बँकेच्या नियमाप्रमाणे ठेवीदार शिक्षण आणि जागरुकता (DEAF) निधी योजना २०१४ नुसार Non Operative (अनियमीत) खाते ग्राह्य धरले जातात व अशा खात्यातील संपूर्ण शिल्लक रक्कम रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार रिझर्व्ह बँकेकडे वर्ग करावी लागते. तरी सर्व ग्राहक/ ठेवीदारांना विनंती की, आपल्या खात्यात तात्काळ व्यवहार करुन खाते अनियमीत असल्यास नियमीत करुन अद्यावत करावे. व सतत त्या खात्यात व्यवहार होत राहतील याची काळजी घ्यावी व आपली खात्यातील जमा रक्कम रिझर्व्ह बँकेकडे वर्ग करण्याची कार्यवाही टाळता येईल याची नोंद घ्यावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी
धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. धुळे
मुख्य कार्यालय, गरुडबाग, धुळे

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या टायटल जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

मौजे महिंदळे येथील स. नं. ९४/१ पैकी प्लॉट नं. ५ चे एकूण क्षेत्र १६० चौ. मी. यापैकी पुर्वेकडील भाग चे क्षेत्र ८० चौ. मी. बखळ प्लॉट.

यासी चतु:सिमा

पुर्वेस : प्लॉट नं. ४ पश्चिमेस : याच प्लॉटचा उर्वरित भाग
दक्षिणेस : स.नं. ९४/३ उत्तरेस : ७.५ मी. रस्ता

येणे प्रमाणे वर्णन असलेली मिळकतीचा आमचे अशिल यांनी मिळकतीचे मालक **सौ. ललीता ज्ञानेश्वर जाधव, ज्ञानेश्वर काशिनाथ जाधव,** रा. ४२, संत सेवादास नगर, चितोड रोड, धुळे यांचेशी कायम खरेदी करणेचा सौदा केलेला आहे.

सबब तमाम लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीत कोणाचेही कोणत्याही स्वरुपाचे जसे सौदा, करार, बक्षीस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह ॲण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्यूपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती, खरेदी-विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे अथवा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क व अधिकार असतील तर त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील नमूद पत्त्यावर पुराव्यानिशी लेखी हरकती नोंदवाव्यात. टपाल व फोनवर तसेच परस्पर वर्तमानपत्रात दिलेल्या हरकती मान्य होणार नाही. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत आमचे आशिलांनी खरेदी करण्यास कोणाचीही काही एक हरकत नाही, तसेच सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे. असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगितलेवरुन त्यांचे वतीने आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे दि. १३/०३/२०२५

ॲड. रोहित राजकुमार छाबिडया
ब्लॉक नं.आर/२,रुम नं.१, कुमारनगर, साक्री रोड,धुळे.
मो.९९२२८२८८८३, ७४९९९९८९५५

जाहीर नोटीस

शिरपूर येथील में.सिव्हील जज्ज सो., ज्युनि.डिव्ही. यांचे कोर्टात

दिवाणी कि.अर्ज नं.२७८/२०२५, नि.६

१) चंद्रकांत भिमराव वाघ, रा.मिल्ट्री स्कूल मागे, १५ जानकीराम नगर, श्री समर्थ कृपा, शिरपूर, ता.शिरपूर, जि.धुळे,
२) विजया अनिल बोरसे, रा.अनवर्दे ता.चोपडा, जि.जळगांव,
३) सुर्यकांत भिमराव वाघ (परागंदा)
३-अ) निर्जला सुर्यकांत वाघ, ३-ब) प्रखर सुर्यकांत वाघ,
३-क) अंजली सुर्यकांत वाघ, ३-अ ते ३-क रा.खामखेडा, पो.टेकवाडे, ता.शिरपूर, जि.धुळे. ..... **अर्जदार**

विरूध्द

कोणीही नाही. ..... **जाबदेणार**

ज्याअर्थी अर्जदार चंद्रकांत भिमराव पाटील वगैरे यांनी मे.न्यायालयात नामे सुशिलाबाई भिमराव पाटील ह्या दि.०६/०५/२०२४ रोजी मौजे शिरपूर ता.शिरपूर जि.धुळे येथे मयत झालेले आहेत. अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर एकमेव वारस असल्याबाबत अर्जदार याने बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये कायदेशीर वारस प्रमाण पत्र मिळणे करीता. अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी तमाम लोकांना कळविण्यात येते की, नामे सुशिलाबाई भिमराव पाटील यांचे वारसांबाबत वर नमूद अर्जास कोणाची काही हरकत/तक्रार असल्यास दि.१५/४/२०२५ रोजी ठिक १०:३० वाजता मे.न्यायालयात हजर होवून लेखी तक्रार सादर करावे तसे न केल्यास अर्जदार यांचा अर्ज मंजूर करून अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक (कोर्टाचा शिक्का) **सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, शिरपूर **दिवाणी न्यायालय, शिरपूर**

जाहीर नोटीस

शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज् सो. ज्युनि.डिव्ही. यांचे कोर्टात

दिवाणी कि.अर्ज नं.३२०/२०२५, नि.६

१) मीनाबाई नाणु दोरीक, वय-४९, धंदा- घरकाम,
२) शुभांगी नाणु दोरीक, वय-२३, कामधंदा- खाजगी नोकरी,
३) दिग्विजय नानु पाटील, वय- २०, कामधंदा- शिक्षण,
सर्व रा.बलकुवे, ता.शिरपूर, जि.धुळे. ..... **अर्जदार**

विरूध्द

कोणीही नाही ..... **जाबदेणार**

X

नानु गजमल दोरीक पाटील, मृत्यू दि.२२/०१/२०२५, रा.बलकुवे ता.शिरपूर, जि.धुळे. ..... **मयत**

ज्याअर्थी अर्जदार यांनी मे.शिरपूर न्यायालयात मयत नामे नानु गजमल दोरीक पाटील हे दि.२२/०१/२०२५ रोजी मौजे बलकुवे ता.शिरपूर जि.धुळे येथे मयत झाल्यामुळे अर्जदार यांना औपचारिक कारणासाठी वारस दाखल्याची आवश्यकता असल्याने अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाचीही काहीएक हरकत असल्यास अथवा काही खुलासा मांडावयाचा असल्यास यांनी दि.२५/४/२०२५ रोजी ठिक सकाळी १०.३० वा. स्वतःअगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहुन लेखी हरकती सादर कराव्यात. त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व कुणाचीही काहीएक हरकत नसल्याचे गृहीत धरून सदर अर्जा बाबत पुढील कारवाई करण्यात येईल.

दि.१३/३/२०२५ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

सही/- सही/-
कनिष्ठ लिपीक (कोर्टाचा शिक्का) **सहा.अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, शिरपूर **दिवाणी न्यायालय, शिरपूर**

जाहीर नोटीस

शिरपूर येथील मे.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर सो., यांचे न्यायालयात

दि.कि.अर्ज नं.२९६/२०२५, नि.६

१) शांतीलाल व्यंकट पाटील, उ.व.७७ वर्षे, धंदा- रा.मु.पो.विखरण ता.शिरपूर, जि.धुळे,
२) सुनंदा अशोक पाटील, उ.व.७७ वर्षे, धंदा- घरकाम, रा.भादली खुर्द, ता.जि.जळगांव. ..... **अर्जदार**

विरूध्द

कुणीही नाही ..... **सामनेवाला**

कै.रूखमाबाई व्यंकट पाटील (मयत), मृत्यू दि.२९/०३/२०१०, मयत ठिकाण विखरण खु.ता.शिरपूर, जि.धुळे. ..... **मयत**

सदरचा अर्ज अर्जदार हे कै.रूखमाबाई व्यंकट पाटील (मयत) मृत्यु दि.२९/०३/२०१० मयत ठिकाण विखरण ता.शिरपूर जि.धुळे यांचे कायदेशीर वारस म्हणून वारस दाखला मिळण्यासाठी या मे.कोर्टात दाखल केलेला आहे. त्या अर्थी जर कोणत्याही व्यक्तीस काहीही हरकत असेल तर त्यांनी वर नमूद अर्जाचेकामी दि.१०/०४/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजेच्या सुमारास मे.कोर्टात व्यक्तीश: व आपल्या वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणणे/हरकत नोंदवावी मे.कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पूर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

शिरपूर, दि.६/०३/२०२५.

आदेशावरून

कामगिरी कारकून (कोर्टाचा शिक्का) **सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व.स्तर सो. धुळे **दिवाणी न्यायालय व.स्तर सो. शिरपूर**
ॲड.बी.आर.बैसाणे धुळे

जाहीर नोटीस

शिरपूर येथील मे.सिव्ही. जज्ज सो., ज्यु.डि. यांचे कोर्टात

दि.कि.अर्ज नं.२६३/२०२५, नि.६

१) रिना शांतीलाल गवळे, वगैरे-५ ..... **अर्जदार**

विरूध्द

कोणीही नाही. ..... **जाबदेणार**

ज्याअर्थी मयत नं.१ कै.सोमाभाई सत्यनारायण अहिरे व मयत नं.२ अलकाबेन सोमाभाई अहिरे हे मौजे- दहिवद, ता.शिरपूर, जि.धुळे येथे मयत झाले असून अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेगयुलेशन अधिनियम १८२७, कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे अर्जदारांना सदरचा वारस दाखला शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि.१०/४/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून, हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही, असे समजण्यात येवून, अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येईल. दि.३/०३/२०२५.

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक (कोर्टाचा शिक्का) **सहा.अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि.धुळे **दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि.धुळे**

जाहीर नोटीस

शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. ज्युनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात

दि.कि.अर्ज नं.२९५/२०२५, नि.६

१) अन्नपूर्णाबाई तोताराम कोळी, २) दंगल तोताराम कोळी,
३) सुभाष तोताराम जाधव (कोळी),
अर्जदार नं.१ ते ३ रा.थाळनेर, ता.शिरपूर, जि.धुळे,
४) भिकुबाई भिमराव कोळी, रा.दलवाडे प्र.सो.चिमठाणे, ता.शिंदखेडा, जि.धुळे. ..... **अर्जदार**

विरूध्द

कोणीही नाही ..... **जाबदेणार**

X

तोताराम तानकु कोळी, मृत्यू ता.१६/०२/२०२५, रा.थाळनेर, ता.शिरपूर, जि.धुळे. ..... **मयत**

ज्याअर्थी मयत तोताराम तानकु कोळी यांचा दि.१६/०२/२०२५ रोजी मौजे-थाळनेर, ता.शिरपूर, जि.धुळे येथे मृत्यू झाला असून, अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७, कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे. अर्जदारांना सदरचा वारस दाखला शासकीय व निमशासकीय योजनांचा लाभ मिळणेसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि.२१/४/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून, हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करणेत येईल. दि.६/३/२०२५

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक (कोर्टाचा शिक्का) **सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि.धुळे **दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि.धुळे**

जाहीर नोटीस

शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज् सो., ज्युनी.डिव्ही. यांचे कोर्टात

दिवाणी कि.अर्ज नं.२८६/२०२५
नि.नं.६ चौ.ता.१६/४/२०२५

देवयानी नरेश सिसोदिया,
रा.२८/ए, हुलेसिंगनगर, करवंद नाका,
शिरपूर, जि.धुळे. ..... **अर्जदार**

विरूध्द

कोणीही नाही ..... **जाबदेणार**

तुलसा नानूराम मोची,
मयताचा पत्ता- बालाजीनगर, मांडळ शिवार, मांडळ,
ता.शिरपूर, जि.धुळे. मृत्यू दि.१६/१२/२०२४. ..... **मयत**

ज्याअर्थी अर्जदार यांची आई नामे तुलसा नानूराम मोची ह्या दि.१६/१२/२०२४ रोजी मोजे मांडळ, ता.शिरपूर, जि.धुळे येथे मयत झालेल्या आहेत. मयतास अर्जदार हेच एकमेव कायदेशीर वारस आहेत. म्हणून अर्जदार यानी बॉम्बे रेग्युलेशन अधिनियमाच्या कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज मे.न्यायालयात त्यांनी दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या नोटीशीने तमाम जनतेला कळविण्यात येते की, तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदारांव्यतिरिक्त जे कोणी कायदेशीर वारस असतील त्यानी मे.न्यायालयात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत अगर दि.१६/४/२०२५ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता स्वत:अगर प्राधिकृत प्रतिनींधीमार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात अन्यथा सदरील अर्जदाराच्या तोंडी लेखी पुरावा घेवून त्या आधारे अर्जदारा व्यतिरिक्त दुसरे कोणीच वारस नाही, असे गृहीत धरण्यात येवून मयताचे वारस म्हणून वारसांचे प्रमाणपत्र अर्जदार यांनी केलेल्या मागणीप्रमाणे देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मे.दिवाणी न्यायाधीश सो., क.स्तर, शिरपूर, जि.धुळे यांचे आदेशावरून प्रसिध्दीस दिली असे.

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक (कोर्टाचा शिक्का) **सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, शिरपूर **दिवाणी न्यायालय, शिरपूर**

जाहीर नोटीस

शिरपूर येथील मे.दिवाणी न्यायाधीश सो. ज्युनि.डिव्ही. यांचे कोर्टात

दिवाणी कि.अर्ज नं.२६६/२०२५

श्री.मधुकर राजाराम बाविस्कर वैगरे ..... **अर्जदार**

विरूध्द

कोणीही नाही ..... **जाबदेणार**

ज्या अर्थीअर्जदार न.१ ते ५ हे मयत न.१) कै.राजाराम सोमा बाविसकर यांची मयत न.२) कै भटाबाई राजाराम बाविस्कर यांचे कायदेशीर वारस असून मयत न.१) कै.राजाराम सोमा बाविसकर ह्यांचा उंटावद ता शिरपूर येथे दिनांक १२/१२/१९९० रोजी व मयत न.२ भटाबाई राजाराम बाविस्कर यांचा दि.२८/०६/२०१९ रोजी उंटावद ता शिरपूर येथे मृत्यू झाला अर्जदार आणि मयत हे मुळचे उंटावद ता शिरपूर जिल्हा धुळे येथे राहत होते मयत यांचे अर्जदार हे अनुकर्मे पत्नी व मूले नात व नातू असे वारस आहेत म्हणून अर्जदारयांना मयत न.१ व २ यांचे वारस असून अर्जदार यांना वारस दाखल्याची आवश्यकता असलेने अर्जदार यांने बॉम्बे रेगुलेशन कायदा १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस दाखला मिळणे साठी/वारसांचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज केला आहे.

त्या अर्थी या नोटीसीने तमाम जनतेस कळविणेत येते की, तमाम जनते पैकी वरील मयताचे या अर्जदार यांचे व्येतिरिक्त जे कोणी वारस असतील त्यांनी या मे.न्यायालयात ही नोटीस प्रसिद्ध झाले पासून ३० दिवसांचे आत अगर दिनाक १०/४/२०२५ रोजी ठीक सकाळी १०.३० वा स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फतहजर राहून लेखी स्वरुपात हरकती सादर करावे अन्यथा सदरील अर्जदार यांचा तोंडी पुरावा घेवून त्या आधारे अर्जदार यांचे व्यतिरिक्त दुसरे कोणीच मयताचे वारस नाहीत असे गृहीत धरण्यात येवून मयताचे वारस म्हणून वारसांचे प्रमाण पत्र अर्जदार यांस मागणी प्रमाणे देण्यात येईल त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही मे.न्यायाधीश सो कनिष्ट स्तर शिरपूर जिल्हा धुळे यांचे आदेशावरून सदरची नोटीस प्रसिद्धीस दिली असे.

आज रोजी, माझ्या साहिनी व को

पान १ वरुन

पाच जागांसाठी उमेदवार निश्चित!

जात आहे. त्यात दादाराव केचे यांच्या विधानसभा मतदारसंघात मुख्यमंत्र्याचे स्विय सहायक असलेल्या सुमीत वानखेडे यांना आमदारकी देताना केचे यांनी बंडखोरी केली होती त्यावेळी केंद्रीय नेत्यांनी त्याना विधानपरिषद सदस्यत्व देण्याचा शब्द दिल्याचे सांगण्यात येत आहे. तर नांदेड येथील राजूरकर यांच्याकडे चव्हाण यांच्यासोबत पक्षात येताना दिल्या गेलेल्या शब्दामुळे हे पद चालून आल्याचे मानले जात आहे. मांधव भांडारी हे २००६ पासून पक्षात प्रवक्ते म्हणून कार्यरत निष्ठावंत नेते मानले जातात, आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकात कोकण मुंबई आणि पुण्यात त्यांच्या उमेदवारीमुळे निष्ठावंत आणि संघ विचारांच्या कार्यकर्त्यांना बळ मिळेल असे मानले जात आहे.

जाणकार सूत्रांच्या माहितीनुसार येत्या काळात कोकणात स्थगित केलेल्या नाणार रिफायनरी प्रकल्पाला बारसू येथे गती देण्यासाठी राजन साळवी यांच्याकडे आमदारकी चालून आली असल्याचे सांगण्यात येत आहे. साळवी यांनी ठाकरे गटात असताना या प्रकल्पासाठी जनमतसंग्रह करण्यात महत्वाची भुमिका बजावली होती. त्यांना बळ दिल्यास प्रकल्पाला विरोध करणा-या ठाकरे गटाला शह देणे महायुतीला शक्य होणार असल्याचे मानले जात आहे. तर मुंबई महापालिका निवडणुकीत नबाब मलिक यांना सोबत घेवून भाजपासह निवडणूक लढणे सोयीचे नसल्याने नवा चेहरा म्हणून झिशान सिध्दीकी यांचा राष्ट्रवादी अजीत पक्षाला फायदा होणार आहे. याशिवाय सना मलिक आणि नबाब मलिक हे देखील पूर्व उपनगरात पक्षाला बळ देवू शकतील. असे मानले जात आहे.

दरम्यान, एक जागा शिवसेनेच्या वाट्याला आलेली आहे. नंदूरबारच्या आमश्या पाडवी यांना सेनेने परिषदेवर संधी दिली होती. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी अक्कलकुवा मतदारसंघात काँग्रेसचे आमदार आणि माजी मंत्री के.सी. पाडवींचा पराभव करत विधानसभा गाठली. आमश्या पाडवींचा विधान परिषदेचा कार्यकाळ ७ जुलै २०२८ पर्यंत होता. पाडवी यांच्या जागी परिषदेवर जाण्यासाठी शिवसेनेतून सहा जण इच्छुक आहेत, अशी माहिती पक्षाच्या मंत्र्याने दिली. याबद्दल पक्षाचे प्रमुख नेते एकनाथ शिंदे वरिष्ठ नेत्यांशी बोलून अंतिम निर्णय घेतील. १७ मार्चपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करायचा असल्याने १६ मार्चपर्यंत उमेदवार जाहीर होईल, असे सेनेच्या मंत्र्याने सांगितले.

विष घेतलेल्या शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू

घेतले आहे, आता तुम्ही खुशाल माझ्या घरोला कुलूप लावू शकता असे सांगून ते खुर्चीवर बसले. त्यांची शुद्ध हरपली. त्यांना तातडीने प्राथमिक आरोग्य केंद्र व तेथून शिरपूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचार सुरू असताना रात्री साडेआठला त्यांचे निधन झाले.

या घटनेनंतर संतप्त नातलगांची गर्दी रुग्णालयात जमली. हरिश्चंद्र पाटील यांच्या मृत्यूला बँक अधिकाऱ्यांची अरेरावी कारणीभूत असून जोपर्यंत त्यांच्यावर गुन्हे दाखल होत नाहीत तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही अशी भूमिका त्यांनी घेतली. दरम्यान दिवसभर नातलगांनी वेगवेगळ्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली. मात्र समाधानकारक मार्ग निघाला नव्हता. त्यामुळे १३ मार्चला रात्री उशिरापर्यंत त्यांचा मृतदेह उपजिल्हा रुग्णालयातच पडून होता. रात्री उशिरा नातलगांनी मृतदेह ताब्यात घेतला. वाडी येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

मृत हरिश्चंद्र पाटील यांना दोन मुले असून दोघेही बाहेरगावी राहतात. काही वर्षापूर्वी त्यांची पत्नी निवर्तली असून मुलगी गावातच अंगणवाडी कार्यकर्ती आहे. पाटील हे एकटेच राहत होते.

बसच्या धडकेने दुचाकीस्वार ठार

आहे. परमिटची मुदत संपल्यामुळे काही दिवसांपासून सदर बस महामार्गाऐवजी बोराडीमार्गे ये-जा करीत होती. या रस्त्यावर जागोजागी खड्डे असून ते चुकवण्याच्या प्रयतकात बस चालकाकडून अपघात झाल्याची माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली.

नर्मदेच्या तिरावर रंगला होलिकोत्सव

सिंधी समाजाचे कार्यकर्ते राजकुमार गुरूबक्षाणी, डॉ.पापालाल पवार, गो.पी. लांडगे जेष्ठ पत्रकार, पिंपळनेरचे पत्रकार अंबादास बेनूस्कर, मध्यप्रदेशातून आलेले भगवान भाई, येडूबाबा, हरेसिंग भाई दरबार, सँच्युरी मिल्सचे शाम भदाणे, गजानन मुजालदे व टीम सहभागी झाले. रात्री होळीसाठी उपस्थित असलेल्या स्त्री, पुरुष यांच्यासमोर सभा घेण्यात आली. यात अहिराणी भाषेचे सुपरस्टार कलावंत प्रकाश पाटील यांनी शेतकऱ्यांची कविता सादर केली. मेधाताई पाटकर यांनी आपले जल, जंगल जमीन वाचावीत आ-पली संस्कृतीचे जतन करावे असे सांगत सावऱ्या दिगर, जीवन नगर गोपाळपूर पुनर्वसन वसाहतींना दारूबंदी केली त्याचे कौतुक करीत इतर ही गावात दारूबंदी झाली पाहिजे म्हणून दारूची बाटली फोडत दारूचा निषेध करण्यात आला. आलेल्या पाहुण्यांना ढोल वाजवण्याचा व ढोलाच्या तालावर नाचण्याचा मोह आवरू शकले नाहीत, रात्रभर ढोल पावाचा नाद सातपुड्यात गुंजत होता, पहाटे होळी पेटवण्यात आली व गावागावातून आलेल्या बावा-बुध्यांनी होळीभोवती फेर धरला. अवघे वातावरण होळीमय झाले होते.गूळ डाळ्याचा नैवेद्य होळीत वाहण्यात आला. होळी यशस्वीपणे पार पाडण्यासाठी राड्या पावरा, ठाणसिंग पावरा, पं.स. सदस्य, रोहीदास पावरा, रमेश पावरा, मान्या पावरा, छगन पावरा, नर्मदा बचाओ आंदोलनाचे लतिका राजपूत, चेतन साळवे, विरसिंग पावरा, विजय वळवी यांनी नियोजन केले.

आदर्श माता पित्यांचा सन्मान अभिनंदनीय

आदर्श माता-पित्यांचा सन्मान या पुरस्काराने केला जातो. यावर्षीचा पुरस्कार धुळे जि.प.चे कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांच्या माता पित्यांना अर्थात तेजराव राणूबा नरवाडे आणि सविता तेजराव नरवाडे यांना प्रदान करण्यात आला. बर्वे स्मृती कन्याछात्रालयात रविवारी झालेल्या या हृद्य सोहळ्यात मंचावर चैत्राम पवार यांच्या सहित, नाट्यकर्मी शंभूराव पाटील, रचनाकार रवी बेल पाठक, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत पवार, निवासी उपजिल्हाधिकारी गावंडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, डॉ.पंकज गोटे, डॉ.प्रतिमा गोटे, उपजिल्हाधिकारी तेजस्विनी नरवाडे, व नातेवाईक उपस्थित होते. चैत्राम पवार यांनी नरवाडे दाम्पत्यास शुभेच्छा दिल्या. आपल्या भाषणात जिल्हाधिकारी पापळकर यांनी हरिजन सेवक संघाची परंपरा आणि गांधींचा विचार याबाबत मनोगत व्यक्त करताना आजच्या काळात अशा उपक्रमांची आणि संस्थांची गरज असल्याचे पुढे बोलताना सांगितले.

सत्काराला उत्तर देताना तेजराव नरवाडे म्हणाले की, ज्या मुलांना आम्ही घडविले त्यांच्या उपस्थितीत आणि त्यांच्या कर्मभूमीत आमचा सन्मान होणे ही दुर्मिळ बाब आहे. सावळी गावच्या विकासाचे टप्पे त्यांनी यावेळी उलगडून दाखवितानाच गावकऱ्यांच्या सहकार्याचा उल्लेख आवर्जून केला. आपल्या मुलांना योग्य ते शिक्षण आणि तालीम देणे हे आजच्या पालकांचे कर्तव्य असून आमच्याप्रमाणेच अडचणींवर मात करून पाल्यांना शिकविले पाहिजे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. मुलांच्या शिक्षणा बाबतचे टप्पे, त्यांची जिज्ञासा, संकटांवर केलेली मात यासंबंधीचा उलगडा त्यांनी यावेळी बोलताना केला.

प्रास्ताविकात महाराष्ट्र हरिजन सेवक संघाचे सेक्रेटरी मधुकर शिरसाठ यांनी संस्थेचा इतिहास आणि संस्थेने बजावलेली कामगिरी यावेळी कथन केली. आयोजक कृष्णा शिरसाठ, प्रा.विलास चव्हाण, रमेश दाणे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. जगदीश देवपूरकर यांनी सूत्रसंचालन केले. आभार प्रदर्शनात मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांनी लहानपणापासूनचा एकूण प्रवास तसेच आई-वडिलांनी दिलेले प्रोत्साहन याबद्दलचा उल्लेख करीत सर्वांचे ऋण व्यक्त केले. तेजराव नरवाडे आणि सौ.सविता नरवाडे यांच्या कर्तृत्वावर आधारित तयार केलेली चित्रफीत कार्यक्रमात दाखविण्यात आली. याप्रसंगी मुकेश ठाकूर, प्रदीप पवार, डॉ.सचिन बोडके, स्वरांजली पिंगळे, प्रदीप निकम यांच्यासह जिल्हा परिषदेतील अधिकारी, कर्मचारी आणि छात्रालयातील विद्यार्थी विद्यार्थिनी, नरवाडे परिवार प्रेमी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

वरखेडीत महिलेची गळफासाने आत्महत्या

धुळे, दि.१४- धुळे तालुक्यातील वरखेडी गावातील पंचवीस वर्षीय विवाहितेने गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे.नातेवाईकांनी दिलेल्या खबरीनुसार, वरखेडी येथील संजना श्रावण ठाकरे (वय २५) ही महिला शेतातील बांधावरील झाडाला गळफास घेतलेल्या स्थितीत आढळून आली. खाली उतरवून सिव्हील हॉस्पिटल येथे दाखल केले असता डॉ.अरूणकुमार नागे यांनी तपासून मयत घोषित केले.

पान १ वरुन

खोक्याच्या घरावर बुलडोझर

कायदेशीर कारवाई मान्य आहे. पण घर पाडणे अयोग्य असल्याची प्रतिक्रिया खोक्याच्या बहिणीने दिली. सतीश भोसले माझा भाऊ आहे. त्याला अटक झाली, त्याची चौकशी सुरु असल्याचे आम्ही बातम्यांमध्ये पाहत होतो. त्याच्यावर झालेले आरोप खरे आहेत की खोटे आहेत, त्याची चौकशी सुरु आहे. पोलीस अधीक्षक चौकशी करत आहेत. ती चौकशी आम्हाला मान्य आहे. पण बुलडोझरने घर पाडणे अयोग्य आहे. घर पाडल्यानंतर काही तासांनंतर त्याचे घरच पेटवून दिल्याची बातमी आली. हा प्रकार योग्य नाही, असे खोक्याच्या बहिणीने म्हटले.

प्रा.डॉ.पितांबर सरोदे यांचे निधन

शकणार नाहीत. केवळ शहिद भूमी म्हणून पुण्यासारख्या शहराला रामराम ठोकत नंदुरबार सारखे अडगळीचे शहर निवडणारे प्रा.डॉ.पितांबर सरोदे हे विद्यार्थी प्रिय प्राध्यापक होते. त्यांनी वयाच्या ९२ व्या वर्षापर्यंत लेखण, वाचन सुरुच ठेवले.त्यांच्यावर अमरधाम स्मशानभूमीवर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी प्रा.जसपालसिंह सिसोदिया, प्रा.डॉ.विश्वास पाटील, प्राचार्य डॉ.बी.एस. दादा पाटील यांनी भावपुर्ण श्रध्दांजली वाहिली. नंदुरबार शहरात लवकरच शोकसभेचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती संदीप चौधरी यांनी सांगितले.

शिंदेकडील खात्यांना कमी निधी?

स्वत:साठी भाजपच्या मदतीने मुख्यमंत्री पद पदरात पाडून घेतले. त्यावेळी देखील भाजपने गृहमंत्रीपद त्यांना देवू केले नाही. आता ते उपमुख्यमंत्री झाले तरी महसूल गृह या दोन्ही खात्यामध्ये शिंदे यांना स्थान दिले नाही. मात्र मुख्यमंत्री असताना कॉमन मॅनची प्रतिमा निर्माण करताना शिंदे यांनी घेतेलेले चांगले निर्णय देखील आता बाजुला केल्याने शिंदेच्या समर्थक आमादारंमध्ये खदखद सुरू झाली आहे असे या सूत्रांनी सांगितले. सणासुदीच्या दिवसात गरिबांना गोडधोड करता यावे यासाठी आणलेली आनंदाची शिधा ही योजना शिंदे यांचे राजकीय सुरू आनंद दिघे यांच्या नावाने सुरू करण्यात आली होती. या योजनेच्या माध्यमातून राज्यातील १ कोटी ६३ लाख रेशनकार्डधारकांना सणासुदीच्या काळात १०० रुपयांमध्ये एक किलो रवा, एक किलो साखर, एक किलो चणाडाळ आणि एक लिटर पामतेल मिळत होते. यंदाच्या बजेटमध्ये अनेक योजनांना निधी देण्यात आला. पण आनंदाचा शिधासाठी एक रुपयांची तरतूद करण्यात आली नाही. या शिवाय दररोज १ लाखांच्या घरात शिवभोजन थाळी योजनेत कोरोनाच्या काळात देखील राज्यातील गरिबांना पोटभर अन्न देणारी योजना शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या १९९५ च्या पहिल्या युती सरकारच्या काळापासून लोकप्रिय होती. मात्र एकनाथ शिंदे यांना राजकीय शह देण्यासाठी या योजना निधीचे कारण देवून थांबविण्यात आल्याने शिवसेना शिंदे गटात अस्वस्थता आहे असल्याची चर्चा आहे.

जयनगरमध्ये होळी सण साजरा

तिलांजली देण्यासाठी आणि आपल्या मनातील वाईट विचारांना होळीप्रमाणे आगीत जाळून राख करण्यासाठी दरवर्षी मोठ्या उत्साह-ने सगळीकडे साजरा करत असतात. दरवर्षीप्रमाणे यावर्षी लोकांमध्ये दांडगा उत्साह दिसून आला. येथे परंपरेनुसार जहागिरदार घराण्यातील दिनेश वसंतगीर गोसावी, तसेच सरपंच मोगराज सोनवणे, गटनेता तथा उपसरपंच वनश्री ईश्वर संतोष माळी यांच्या उपस्थितीत होळीचे आयोजन करण्यात आले. या वर्षी अगोदर खास करून होळीला मानवंदना देण्यासाठी बाहेरगावाहून मध्य प्रदेश येथील नृत्यपथक गेर (होळीसाठी आदिवासी नृत्य सादर करणारे बांधव) मागविले होते. संपूर्ण गावात वाजत- गाजत होळीची सुरुवातीला मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर चौकात होळी जाळण्याचा जागेवर होळीची पूजा, नैवेद्य, नारळाचे तोरण यासह मान्यवरांच्या हस्ते पूजा करून होळी पेटविण्यात आली. होळी पेटविल्या नंतरही होळीच्या चौफेर वाजत गाजत नृत्य सादर करण्यात आले. यानंतर सर्व ग्रामस्थांनी जळत्या होळीच्या पाच प्रदक्षिणा पूर्ण केल्या. नंतर होळी मधील ओल्या खोबऱ्याचे प्रसाद घेण्यासाठी ग्रामस्थांमध्ये चढाओढ दिसून आली. पुजेच्यावेळी पोलीस पाटील संदीप चित्ते, ग्रामपुरोहित सुनील जोशी, शरद पाटील, मडकू पारधी, किशोर करंजे, मोहन पारधी, संतोष पारधी व ग्रामस्थ उपस्थित होते. ग्रामपंचायतने १० ते १२ दिवस अगोदरच यावर्षी फक्त गोवऱ्यांची होळी करण्यात येईल. यासाठी ग्रामस्थांना शेण गोळा करून गोवऱ्या करून आणण्याचे आवाहन केले होते. त्यानुसार गावामध्ये प्रत्येक कुटुंबाने शेण गोळा करून होळीसाठी गोवऱ्या तयार केल्या होत्या. होळी पडल्यावर घराघरातील व्यक्तींनी होळीची मनोभावे पूजा करून होळीतील विस्तव घरी पूजनासाठी घेऊन गेले. या होळीच्या आनंद उत्सवात गटनेता तथा उपसरपंच वनश्री ईश्वर माळी यांनी स्वत:ढोल वाजवत नृत्याच्या आनंद घेतला. तसेच ग्रामस्थांनी नाचत गाजत होळीचे मोठ्या उत्साहात स्वागत केले.

निधन वार्ता

कविता बिरारी

धुळे दि.१४- येथील सुपरिचित उद्योजिका व सिध्देश कॉम्प्युटर्सच्या संचालिका प्रा.सौ.कविता संतोष बिरारी (वय ५०) यांचे आज सकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर आज सायंकाळी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती रोटरी क्लब धुळे क्रॉस रोड सदस्य प्रा.संतोष बिरारी, दोन मुले असा परिवार आहे.

प्रदीप मुंदडा

धुळे, दि.१४- येथील डॉ.मयूर यांचे वडील प्रदीप भाऊसाहेब मुंदडा (वय ६८) यांचे आज दि.१४ रोजी अल्पशा: आजाराने सकाळी ११.५० वा. निधन झाले. त्यांची अंतयात्रा शनिवार, १५ रोजी सकाळी ९ वाजता त्यांच्या गल्ली क्र.६ मधील राहत्या घरा पासून ते एकवीरा देवी अमरधाम येथे निघेल. त्यांच्या मागे पत्नी सुनीता, मुलगा डॉ.मयूर, मुलगी दामिनी, जावई, नातवंड असा परिवार आहे.

राधाबेन पाटील

शहादा, दि.१४- तालुक्यातील पिंगाणे येथील रहिवासी राधाबेन बन्सी पाटील (७६) यांचे वृद्धपकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, सून, तीन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्या विकास हायस्कूलचे शिक्षक व धुळे-नंदुरबार जिल्हा शिक्षक पतपेढीचे संचालक अमोल बन्सी पाटील यांच्या आई व उपसरपंच हेमलताबेन पाटील यांच्या सासू होत.

परमानंद ठाकुर

धुळे, दि.१४- जमनागिरी रोड, सम्राट नगरातील प्लॉट नं.१६ अ, इंदुपुरम येथिल रहिवासी परम नंद परशराम ठाकूर यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या अंत्ययात्रेत शहरातील सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक क्षेत्रातील तसेच वकीली व्यवसाय करणारे अनेक प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. शहरातील भरत ठाकूर व विधीज्ञ लक्ष्मीकांत ठाकूर यांचे ते वडील होत.

सुरेखा पाटील

शिरपुर,दि.१४- शिरपूर तालुक्यातील भटाणे गावातील रहिवासी सुरेखाबाई शेनपडू पाटील यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७१ वर्षांच्या होत्या. त्या नुतन माध्यमिक विद्यालयातील उपशिक्षक योगेश साळुंके यांच्या मातोश्री होत.

धुळे- होळी सणा निमित्त शहरातील आग्रा रोडवरील श्री खंडेराव महाराज मंदिरात फुल व रंगांची उधळण करत होळी सण साजरा करण्यात आला. महिला-पुरुषांसह लहान मुले यात सहभागी झाले.

धुळवडीच्या उत्सवात रमले धुळेकर; सर्वत्र जल्लोष डि.जे.च्या तालावर रंगोत्सवात थिरकली तरूणाई

धुळे, दि.१४- शहरासह जिल्ह्यात विविध ठिकाणी होळी व धुळवडीचा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. चौका-चौकात तरूणाईचा जल्लोष दिसून आला. धुळवडीच्या उत्सवाला कोणतेही गालबोट लागु नये यासाठी पोलीस प्रशासन डोळ्यात तेल घालून सज्ज होता. वेगवेगळ्या आकारातील मुखवटे, कृत्रिम केशभुषा, बनावट सोन्याच्या चैन, सिलिंडर रंग यावेळी विशेष आकर्षणाचा विषय ठरले. धुळवडीच्या उत्सावात डि.जे.च्या तालावर तरूणाईने ठेका धरलेला दिसून आला.

वाडीभोकर रोडवरील उत्तरमुखी मारूती मित्र मंडळ, सहावी गल्ली, ग.नं.५, खोल गल्ली, मोगलाई, खंडेराव बाजार चौक, स्टेशन रोड, चितोड रोड, गुरूनानक सोसायटी अशा अनेक ठिकाणी धुळवडीचा उत्सव बालक, महिला व पुरूषांनी आनंदात साजरा केला. आग्रा रोडवरील खंडेराव बाजार चौक ते पाच कंदील परिसरात शहरातुन युवक मोठ्या संख्येने एकत्र येत असल्याने गैर प्रकार होवू नये यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे यांच्या मार्गदर्शनाखाली तीन पोलीस उपअधीक्षक, बारा पोलीस निरिक्षक, त्रेसष्ट पोलीस उपनिरिक्षक, एक हजार तीनशे वीस पोलीस कर्मचारी, होमगार्ड पुरूष सातशे, महिला होमगाडे दोनशे, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.६ धुळेची एक कंपनी, आर.सी.पी. पथक ४ तसेच क्यु. आर.टी पथक ठिकठिकाणी सज्ज करण्यात आले.

अफुची तस्करी करणारे राजस्थानचे दोघे गजाआड एलसीबीची कारवाई; लाखोंचा मुद्देमाल हस्तगत

धुळे, दि.१४-शिरपुर तालुक्यातील पळासनेर शिवारातील चारणपाडा गावाजवळून अफुची तस्करी करणाऱ्या दोघांच्या एल.सी.बी. च्या पथकाने मुसक्या आवळल्या आहेत. दोघांकडून अफु व इतर साहित्य असे बाविस लाख बॅऐंशी हजार आठशे रूपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

एल.सी.बी.चे पोनि. श्रीराम पवार यांना मिळालेल्या माहितीनुसार, शिरपुर तालुक्यातील चारणपाडा गावाजवळी गतिरोधकाजवळ सेंधवा येथून शिरपूरकडे जाणारे वाहन क्र.जीजे ३७/जे-४०७० ला अडथळा निर्माण करून थांबवून तपासणी केली असता चालक रमेशकुमार मानाराम बिश्नोई (वय ३३)रा. कालीराणा नगर, भोजासर, ता.फलोदी, जि.जोधपूर राजस्थान ह.मु.मेनगेट दाना मंडी वाशी मुंबई व राकेशकुमार मांगीलाल बिश्नोई (वय १८)रा. गांव खारा, ता.फलोदी, जि.जोधपूर राजस्थान यांच्या वाहना-तील मानवी मेंदुवर परिणाम करणारी अकरा लाख बॅऐंशी हजार आठशे रूपये किंमतीची अफुची सुकलेली बोंडे, पंच्याहत्तर रूपये किंमतीचा मोबाईल, पंचवीस हजार रूपये किंम तीचा मोबाईल, दहा लाख रूपये किंमतीचे वाहन असा एकुण बाविस लाख बॅऐंशी हजार आठशे रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. दोघांविरोधात एल.सी.बी.चे पोहेकॉ.राजेंद्र ठाकुर यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार एन.डी.पी.एस.कायदा कलम १९८५ कलम ८ (क), १७ (क) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे यांच्या मार्गदर्शनाखाली एल.सी.बी.चे पोनि. श्रीराम पवार, शिरपुर तालुका पोलीस स्टेशनचे पोनि.जयपाल हिरे, पोउनि. अमित माळी, असई. शाम निकम, पोहेकॉ. पवन गवळी, आरीफ पठाण, पंकज खैरमोडे, देवेंद्र ठाकूर, पोकॉ.मयुर पाटील, राजीव गिते, जयराज शिंदे, असई.कैलास जाधव, शेखर बागुल, पोकॉ.मनोज पाटील, धनराज गोपाळ, इसरार फारूखी यांनी केली.

पाहिजेत
१) कॉम्प्युटर ऑपरेटर
२) फोनवर ऑर्डर घेण्यासाठी माणूस पाहिजे.
वय अंदाजे १८ ते ४०, पार्टटाईम जॉब वाल्यांनी संपर्क करु नये.
सुपर ॲल्यु हाऊस
मनमाड जीन, पारोळारोड,धुळे
7020469216

फ्लॅट भाड्याने देणे
2 BHK फ्लॅट भाड्याने देणे आहे.
अग्रवाल नगर, भारत नर्सरी जवळ, धुळे
-: संपर्क :-
9421799330

कार्टून पुठ्ठा
रु.१६.०० प्रति किलो बंडल
येथे सर्व प्रकारची रद्दी विकत घेतली जाईल.
मेवावाला जिन कम्पाऊंड भारत वे ब्रिज, पारोळारोड,धुळे
फोन : 230540
9422296340

पाहिजेत
दुकान कामासाठी मुले पाहिजेत.
समक्ष भेटा!
कट एन कार्व
ओम डिजीटल, ग.नं.६, धुळे

पाहिजे
लॉजिंगच्या कामासाठी वेटर पाहिजे. समक्ष भेटा!
सुयोग लॉज
संकल्प दातांच्या दवाखान्याजवळ, दसेरा मैदान समोर, मालेगावरोड, धुळे

- पाहिजेत -
• नर्स/स्टाफ
• RMO
डे-नाईट शिफ्टसाठी अनुभवी उमेदवार पाहिजेत
इच्छूक उमेदवारांनी समक्ष भेटावे
यशोदा हॉस्पिटल व नेत्रालय
दत्त मंदीर, देवपूर, धुळे
7058912916, 8329249386

दत्तमंदिर चौकात प्लॉट
देवपूर दत्त मंदिर चौक परिसरात ३०००, ५००० आणि ६५०० चौरस फूटाचे प्लॉटस् विकणे आहे
-: संपर्क :-
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

रोडटच शेती विकणे
चाळीसगाव रोडटच आणि साक्रीरेड टच हॉटेल, मॅरेज लॉन, मंगल कार्यालयासाठी उपयुक्त एक एकर आणि दोन एकर शेती विकणे आहे
-: संपर्क :-
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

SVKM जवळ प्लॉटस् विकणे
एस.व्ही.के.एम. शाळेजवळ सुसज्ज वसाहतीतील प्लॉट्स विकणे आहे
-: संपर्क :-
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

सेल्समन/सेल्सगल
रेडिमेड कापड दुकानासाठी अनुभवी सेल्समन/सेल्सगल/टेलर पाहिजे.
समक्ष भेटा!
कटारिया डिपार्टमेंटस्
गांधी पुतळ्याजवळ, आग्रारोड,धुळे

भाड्याने देणे आहे
१ रुम किचन असलेले घर भाड्याने देणे आहे
पत्ता : गोविंदा अपार्टमेंट, वर्षा बिल्डींगजवळ, धुळे
-: संपर्क :-
9423494345

भाड्याने देणे आहे
मालेगाव रोडटच पहिल्या मजल्यावर असलेले ऑफिस भाड्याने देणे आहे
पत्ता : शारदा हॉटेलच्या बाजुला, मालेगावरोड, धुळे
-: संपर्क :-
9423494345

कुलिंग इंडिया की पहचान
Symphony | Crompton
आत्ता पर्यंतच्या कुलर्सच्या तुलनेत सर्वात स्टायलिश मॉडेल्स्'

आता खरेदी करा कूलर 0% EMI वर
BAJAJ FINSERV 0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
नियम व अटी लागू*
ak media- 238222
58 वर्षापासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-४००४११५, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०